cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२४ | रविवार दि.१२ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘उच्च मतदानाचा कल कोणाकडे?

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुदुच्चेरी या पाच राज्यांतील निवडणुका राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मतदानाच्या पहिल्या टप्प्यात आसाममध्ये ८५ टक्के, पुदुच्चेरीत ८९.८७ टक्के, तर केरळमध्ये ७९ टक्के मतदान झाले. यातील आसाम आणि पुदुच्चेरीतील मतदान म्हणजे नवा उच्चांकच ठरावा. आसाम हे राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे राज्य होय. या राज्यात भाजप आणि काँग्रेस यांच्यात सरळ लढत आहे.


# मोफत जमिनींचा निर्णय रद्द ! आता रेडीरेकनर दरानेच वाटप

## शेती महामंडळाच्या ८० हजार एकरपैकी ४२ हजार एकर आधीच मोफत

## महसूल वाढीसाठी सरकारचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शेती महामंडळाकडे असलेल्या जमिनींच्या वाटपाबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा धोरणात्मक बदल केला आहे. आतापर्यंत स्थानिक स्वराज्य संस्था, एमआयडीसी आणि इतर शासकीय विभागांना मोठ्या प्रमाणावर मोफत दिल्या गेलेल्या जमिनी आता पुढे विनामूल्य देण्यात



येणार नाहीत. यापुढे या जमिनी रेडीरेकनरच्या दरानेच देण्यात येणार असल्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे.

सिलिंग ॲक्ट १९६१ अंतर्गत राज्य सरकारच्या ताब्यात आलेल्या सुमारे ८० हजार एकर अतिरिक्त जमिनींपैकी तब्बल ४२ हजार एकर जमीन गेल्या काही दशकांत विविध संस्थांना मोफत वाटप करण्यात आली आहे. या धोरणामुळे शेती महामंडळाच्या मालकीची जमीन झपाट्याने कमी झाली असून उत्पन्नाचे स्रोतही घटले आहेत. मोफत जमिनींच्या वाटपामुळे भविष्यात महामंडळाकडे जमीन आणि आर्थिक स्रोत उरणार नाहीत, अशी भीती व्यक्त होत होती. याच पार्श्वभूमीवर आता जमिनी देताना किमान आर्थिक मोबदला मिळावा, यासाठी रेडीरेकनरनुसार दर आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी गावठाण हद्दीपासून पाच किलोमीटरपर्यंतच्या जमिनी ग्रामपंचायतींना गावठाण विस्तार, घरकुल योजना, घनकचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठा यांसारख्या कामांसाठी मोफत देण्याची मुभा होती. मात्र या सवलतीमुळे मोठ्या प्रमाणावर मागणी वाढून जमीनसाठा कमी झाला. नव्या निर्णयामुळे शेती महामंडळाला उत्पन्न मिळण्यास मदत होणार असून मोफत जमिनींच्या वाढत्या मागणीवरही नियंत्रण येणार आहे.

## थोडक्यात...

### डिझेल–विमान इंधनाच्या निर्यात शुल्कात वाढ

दिल्ली : जागतिक तेल बाजारातील वाढती अस्थिरता आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ पाहता, केंद्र सरकारने डिझेल आणि विमान इंधनाच्या निर्यात शुल्कात मोठी वाढ केली आहे. देशांतर्गत बाजारपेठेत इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि किमती नियंत्रणात राहाव्यात, या उद्देशाने वित्त मंत्रालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वित्त मंत्रालयाने शनिवारी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, नवीन दर तातडीने लागू करण्यात आले आहेत. सुधारित दरांनुसार, डिझेलवरील निर्यात शुल्क २१.५ रुपये प्रति लीटरवरून थेट ५५.५ रुपये प्रति लीटर करण्यात आले आहे. विमान इंधन एटीएफवरील ड्युटी २९.५ रुपये प्रति लीटरवरून वाढवून ४२ रुपये प्रति लीटर केली आहे. विशेष म्हणजे, पेट्रोलच्या निर्यातीवरील शुल्कात कोणताही बदल करण्यात आलेला नाही; ते पूर्वीप्रमाणेच ‘शून्य’ ठेवण्यात आले आहे. ११ एप्रिल रोजी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत सरकारने स्पष्ट केले आहे की, सध्याची जागतिक परिस्थिती पाहता हे पाऊल उचलणे अनिवार्य होते. सेंट्रल एक्साईज ॲक्ट १९४४ आणि फायनान्स ॲक्टमधील तरतुदींनुसार हे बदल करण्यात आले आहेत. ‘‘सध्या उद्भवलेली परिस्थिती पाहता जनहितार्थ तातडीने निर्णय घेणे आवश्यक होते,’’ असे वित्त मंत्रालयाने नमूद केले आहे.

### अंबानींकडून पशुवैद्यक विद्यापीठाची घोषणा

जामनगरः रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांनी स्थापन केलेल्या वनतारा या जागतिक वन्यजीव संरक्षक संघटनेने एका ऐतिहासिक प्रकल्पाची घोषणा केली आहे. गुजरातच्या जामनगरमध्ये वनतारा विद्यापीठ सुरू होत असून, वन्यजीव संरक्षण आणि पशुवैद्यकशास्त्र या क्षेत्राला पूर्णपणे वाहिलेले हे पहिले एकात्मिक जागतिक विद्यापीठ असेल. विशिष्ट हेतूंसाठी निर्माण केलेल्या या आधुनिक काळातील गुरुकुलाचा उद्देश वन्यजीव आणि पशुवैद्यक शिक्षण या क्षेत्रात देशाला जगात प्रमुखस्थान मिळवून देणे हा आहे. पशुकल्याण क्षेत्रातील शास्त्रीय संशोधनवाढवणे तसेच वन्यजीव संरक्षणाचे भवितव्य सुरक्षितकरणे, ही या विद्यापीठाची उद्दिष्टे आहेत. पशुवैद्यकऔषधे, वन्यजीव संरक्षण आणि वन्यजीवांचे संवर्धनया क्षेत्रात जागतिक दर्जाचे तज्ज्ञ निर्माण करणे हेविद्यापीठाचे ध्येय आहे. या विद्यापीठाचे अभ्यासक्रमभारताच्या परंपरागत ज्ञानावर आधारित असतील.

### भाजपने माझी उमेदवारी रद्द केली–ममता बॅनर्जी

कोलकाताः पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपवर गंभीर आरोप करत भवानीपूर मतदारसंघातून आपली उमेदवारी रद्द करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा दावा केला. पश्चिम मेदिनीपूर जिल्ह्यातील केशियारी येथे झालेल्या प्रचारसभेत त्यांनी सांगितले की, ‘‘भवानीपूरमधून माझी उमेदवारी रद्द करण्यासाठी दोन खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले होते. त्यांना तसे करता आले नाही; पण कल्पना कराजर ते माझ्या विरोधात असे करू शकत असतील, तर इतरांच्या विरोधात ते काय काय करू शकतील!’’ भवानीपूर मतदारसंघात त्यांच्याविरोधात भाजपचे नेते शुभेंदू अधिकारी रिंगणात आहेत.

# महिलांना सभागृहात आरक्षण देण्याचा निर्णय हे महात्मा फुले यांना खरे अभिवादन–मुख्यमंत्री

## खानवडीत ‘ज्योती–सावित्री जिल्हा परिषद शाळेचे फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन





पुरंदर /पुणे । प्रतिनिधी


**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला असून तो महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्री–शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून त्यांना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे मुळगाव खानवडी (ता. पुरंदर) येथे पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेल्या ‘ज्योती–सावित्री जिल्हा परिषद शाळेचे’ उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे, अल्पसंख्याक मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, शिक्षण राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पैतृक गावात उभारलेली ही अत्याधुनिक शाळा म्हणजे द्विशताब्दी वर्षाची सर्वात योग्य सुरुवात आहे. सीबीएसई पॅटर्नवरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद

▶▶ पान २ वर

### “ महात्मा फुलेंच्या नावाने कौशल्य विकासाची एक हजार केंद्रे उभारणार

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुणे जिल्हा परिषदेकडून ‘इंडस्ट्री ४.०’ अंतर्गत १०० शाळांमध्ये १०० अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यात आल्या असून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली असून भविष्यात अशी एक हजार केंद्रे उभारण्यात येतील असे सांगितले.



# लाडक्या बहिणींना एप्रिल अखेरीस ३००० मिळणार!

मुंबई । प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेच्या लाखो लाभार्थी महिला मार्च महिन्याच्या हप्ताचे पैसे कधी मिळणार याची वाट पाहत आहेत. एप्रिल महिन्याचा दुसरा आठवडा संपत आला तरी देखील पैसे अद्याप आले नाहीत त्यामुळे लाडक्या बहिणी चिंतेत आहेत. पण लाडक्या बहिणींना चिंता करण्याचे कारण नाही. कारण लाडकींच्या खात्यात लवकरच ३००० रुपये जमा होण्याची शक्यता आहे.

लाडकी बहीण योजनेच्या मार्च आणि एप्रिल महिन्याच्या हप्त्याचे ३००० रुपये एकत्रित येणार असल्याची चर्चा सुरू आहे.

▶▶ पान २ वर

# नाशिकमध्ये अपघातानंतर पिकअपने पेट घेतला; चौघांचा होरपळून मृत्यू

नाशिक । प्रतिनिधी


भरधाव ट्रकने पिकअपला जोरदार धडक दिली. अपघातानंतर पिकअपने पेट घेतला. या आगीमध्ये होरपळून चौघांचा मृत्यू झाला. तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जागरण गोंधळाच्या कार्यक्रमावरून परत येत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सिन्नर तालुक्यात पंचाळेजवळ हा भीषण अपघात झाला. ट्रक आणि पिकअपची समोरासमोर धडक झाली. हा अपघात इतका भीषण होता की अपघातानंतर पिकअपने पेट घेतला. या अपघातामध्ये बाहेर फेकल्या गेलेल्या एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर तिघांना पिकअपमधून बाहेर पडता न आल्याने त्यांचा होरपळून मृत्यू झाला. मध्यरात्री या अपघाताची माहिती मिळताच सिन्नरच्या रुग्णवाहिका, सिन्नर नगरपालिकेचे अग्निशमन दल, एमआयडीसीचे अग्निशमन दल आणि एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मध्यरात्री मदतकार्य केले. या अपघातामध्ये जखमी झालेल्या दोघांना

▶▶ पान २ वर

# आरटीई प्रवेश लॉटरी जाहीर!

## १ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळाला प्रवेश





पुणे । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी काढण्यात आलेल्या लॉटरीतून १ लाख ५ हजार ५८२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. त्यात सर्वसाधारण गटातील १ लाख ५ हजार २२९, तर दिव्यांग गटातील ५८२ विद्यार्थ्यांचा समावेश असून, २० एप्रिलदरम्यान संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करता येणार आहेत, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी ही माहिती दिली.

‘आरटीई’अंतर्गत राज्यातील ८ हजार ७०१ शाळांतील १ लाख १४ हजार २८५ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत. या जागांसाठी २ लाख ८९ हजार ३८५ अर्ज दाखल झाले. प्रवेशाच्या जागांपेक्षा अर्जांची संख्या जास्त असल्याने ६ एप्रिल रोजी लॉटरी काढण्यात आली. त्यातून १ लाख ५ हजार

▶▶ पान २ वर

### कागदपत्रांची पडताळणी गरजेची

लॉटरीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांच्याकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी समितीमार्फत पडताळणी करावी. पडताळणी समितीने प्रवेशपात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कागदपत्रांची तपासणी करून प्रमाणित केल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन प्रत उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# अंगणवाडी सेविका, मदतनिसच्या २ लाखहून अधिक पदांची भरती!



## महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारने महिला व बाल विकास क्षेत्रासाठी महत्त्वाचा निर्णय घेत, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदांच्या मोठ्या भरतीला मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

महिला व बाल विकास विभागात तब्बल २३ वर्षांनंतर नियमित पदभरती होत असून, ८६६९ पदे भरण्यास हिरवा कंदील देण्यात आला आहे. यासोबतच काही पदे रद्द करून १६५ नवीन पदांची निर्मिती करण्यात आली आहे. याबाबत माहिती आदिती तटकरे यांनी दिली. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.११ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२४.५० क्विंटल | २,०६३ | २,६५१ | २,२८६ |
| ज्वारी/हायब्रिड: १२९.५० क्विंटल | १,८०० | ३,८७१ | २,६८७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १९.५० क्विंटल | ७,२०० | ७,४०० | ७,३०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ५०.०० क्विंटल | २,३०० | २,६८६ | २,४८६ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ५,१०० | ५,२३० | ५,१५६ |



# सोन्याच्या दरात पुन्हा उसळी

जळगाव । प्रतिनिधी

आखाती देशात इराण–अमेरिकेने जाहीर केलेल्या शस्त्रसंधीमुळे आंतरराष्ट्रीय बाजार पुन्हा रुळावर येऊ लागले आहेत. सराफा बाजारातही सोने आणि चांदीच्या दरात वाढ झाली आहे. मुंबई, पुणे आणि दिल्लीतील बाजारात सोन्याच्या दरात वाढ झाली आहे. सोन्याचे दर शनिवारी दीड लाखाच्या घरात पोहोचले आहेत. ऐन लग्नसराईत सोन्याचे भाव वाढल्याने ग्राहकांचे टेन्शन वाढल्याचे पाहायला मिळत आहे. मुंबईत २४ कॅरेट सोन्याच्या दरात प्रति तोळा ४९० रुपयांनी वाढ झाली

▶▶ पान २ वर

# शंभुराज देसाईंसाठी ४० आमदार एकवटले, पण दादांसाठी एकही आमदार आला नाही

## अमोल मिटकरींची खंत, ‘जस्टिस फॉर दादा’ आंदोलनाची घोषणा



अकोला । प्रतिनिधी

**अधिवेशनाच्या काळात शंभुराज देसाईंचे साताऱ्याचे प्रकरण होते, त्यांच्यासोबत त्यावेळी शिवसेना आणि राष्ट्रवादीचे ४० आमदार एकवटले. पण आपण अजितदादांचा फोटो घेऊन विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलनासाठी बसलो होतो, पण विनंती करूनही कुणीही आले नाही अशी खंत राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केली. त्यावेळी जर आमदार आपल्यासोबत आंदोलनासाठी बसले असते तर अजितदादांच्या अपघाताच्या तपासप्रकरणी आज वेगळे चित्र असते. दुर्दैवाने आपण ती वेळ गमावून बसलो, अशी खंतही अमोल मिटकरी यांनी व्यक्त केली.**

अमोल मिटकरी यांनी अनेक धक्कादायक मुद्दे मांडले आहेत. अपघाताच्या दिवशी नेमकं काय घडलं, विमानात किती लोक होते, पायलट कोण होता, आणि ब्लॅक बॉक्सचा डेटा अद्याप का जाहीर करण्यात आला नाही, असे सवाल त्यांनी उपस्थित केले. मिटकरी यांनी अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित करत राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.

▶▶ पान २ वर

### “ राज्यभर आंदोलनाची तयारी

या प्रकरणाचा तपास वेगाने व्हावा आणि सत्य समोर यावे यासाठी ‘जस्टिस फॉर दादा’ आंदोलन सुरू करण्याची घोषणा अमोल मिटकरी यांनी केली आहे. जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर यात्रा काढून जनतेचा पाठिंबा मिळवण्याचा त्यांचा मानस आहे. ग्रामसभांमध्ये ठराव मंजूर करून ते मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना सादर केले जाणार असल्याचे अमोल मिटकरी यांनी सांगितले. यामुळे हा मुद्दा आगामी काळात आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

cmyk

## अग्रलेख

# 'उच्च मतदानाचा कल कोणाकडे? निकालावर मोठा प्रश्न'

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुदुच्चेरी या पाच राज्यांतील निवडणुका राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मतदानाच्या पहिल्या टप्प्यात आसाममध्ये ८५ टक्के, पुदुच्चेरीत ८९.८७ टक्के, तर केरळमध्ये ७९ टक्के मतदान झाले. यातील आसाम आणि पुदुच्चेरीतील मतदान म्हणजे नवा उच्चांकच ठरावा. आसाम हे राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे राज्य होय. या राज्यात भाजप आणि काँग्रेस यांच्यात सरळ लढत आहे. मुख्यमंत्री हेमंत बिस्वा शर्मा आणि काँग्रेस नेते गौरव गोगोई यांच्या नेतृत्वाच्या लढाईत कुणाची सरशी होते, हे पाहणे औत्सुक्याचे असेल.

बांगलादेशी घुसखोरी, एनआरसी-सीएएद्वारे नियंत्रणाचे आश्वासन, आसामी अस्मिता व कल्याणकारी योजना यांसारख्या मुद्द्यावर भर दिलेल्या भाजपसाठी राज्यात सकारात्मक वातावरण असल्याचे मानले जाते. सलग तिसऱ्यांदा भाजप राज्यात यश मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. किंबहुना, आसाममध्ये काँग्रेसचीही व्होटबँक आहे. शिवाय अँन्टी इन्कबन्सी फॅक्टरही काँग्रेसला हात देण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, प्रादेशिक पक्षांमुळे होणारे विभाजन ही पक्षाच्या मार्गातील अडचण असेल. पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश आहे. तेथे एआयएनआरसी-भाजप आणि काँग्रेस-द्रमुक हे एकमेकांचे प्रतिस्पर्धी असतील. एन. रंगासामी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार तेथे पुन्हा सत्ता मिळविण्यासाठी पुढे सरसावले आहे. रंगासामी यांची लोकप्रियता आणि दोन पक्षातील एकजूट हा एनडीएचा प्लस पॉईंट आहे. तथापि, काँग्रेसनेही तिथे जोर लावला आहे. तामिळनाडू आणि पुदुच्चेरीचा राजकीय व सांस्कृतिक अनुबंध असल्याने डीएमकेचाही तेथे प्रभाव दिसतो. पुदुच्चेरीला राज्याचा दर्जा मिळण्यासह काही मुद्दे काँग्रेस आघाडीने लावून धरले आहेत. त्यामुळे तेथे काट्याची टक्कर होईल. अर्थात छोट्या पक्षांची कामगिरी कशी होते, यावरही बरेच गणित अवलंबून राहील. केरळ हे देशातील सर्वाधिक साक्षर राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्यात काँग्रेस आणि डाव्यांमध्ये पूर्वापार संघर्ष आहे. मागच्या दोन टर्म येथे डाव्यांची सत्ता असून, तिसऱ्यांदा लाल बावटा फडकवण्यासाठी डावे प्रयत्नशील दिसतात. मतदानात उत्साह दिसत असला, तरी हा कल नेमका कुणाच्या बाजूने आहे, हे पाहण्यासाठी निकालाच्या दिवसापर्यंत वाट पहावी लागेल. मजबूत केडर, कल्याणकारी योजना ही डाव्यांची ताकद आहे. मात्र, काही ठिकाणी त्यांना अंतर्गत नाराजीचा सामना करावा लागला आहे. अँन्टी इन्कबन्सी फॅक्टरचीही त्यांना धास्ती असेल. केरळात काँग्रेसचेही चांगले संघटन आहे. पक्षाने जोरदार ताकद लावल्याने डाव्यांपुढे आव्हान निर्माण झाल्याचे दिसते. त्यामुळे दोन्ही पक्षांना या राज्यात समसमान संधी असल्याचे मानले जाते. भारतीय जनता पक्षाच्या दक्षिण विस्ताराला मर्यादा राहिल्या आहेत. परंतु, अलीकडच्या काळात भाजपाने दक्षिणेतही हात पाय पसरायला सुरुवात केल्याचे पहायला मिळते. तिरुवनंतपूरममध्ये मिळवलेले यश हा त्याचाच परिपाक. राज्यात भाजप शर्यतीत नसेलही. मात्र, ४ ते ५ जागांवर त्यांनी प्रभाव टाकल्याचे विश्लेषण केले जाते. खरेतर पक्षाला या राज्यात गमावण्यासारखे काही नाही. एक किंवा दोन जागा मिळाल्या, तरी पक्षासाठी ते बेरजेचेच राजकारण असेल. सर्वसाधारणपणे जादा मतदान म्हणजे सत्ताधारीविरोधी लाट, असे एकेकाळी मानले जायचे. पण, सध्याची स्थिती तशी नाही. अनेकदा अधिकचे मतदान म्हणजे सत्ताधाऱ्यांचा विक्रमी विजय, असाही निकालाचा अन्वयार्थ लावावा लागतो. हे लक्षात घेता या अधिकच्या मतदानाकडे एकाच चष्म्यातून पाहता येणार नाही. पुढच्या टप्प्यात तामिळनाडू व पश्चिम बंगालमध्येही मतदान होत असून, तेथील मतटक्काही निर्णायक असेल.

# गेवराईत काँग्रेसच्या सृजन अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## काँग्रेस विचार घराघरात पोहोचविणार-तालुकाध्यक्ष महेश बेदरे

**गेवराई । प्रतिनिधी**

**अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या आज गेवराई काँग्रेस पक्षाच्या नवीन बस स्थानका समोरील मध्यवर्ती कार्यालयात येथे 'संगठन सृजन अभियान' संपन्न झाले या अभियानास गेवराई मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या अभियानास प्रमुख मान्यवर म्हणून काँग्रेसच्या केंद्रीय प्रभारी नीतू वर्मा मॅडम व सहप्रभारी माजी आमदार एम एम शेख यांनी प्रमुख मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन कार्यक्रमास सुरुवात केली.**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने काँग्रेस पक्षाची पक्ष बांधणी, संघटना मजबुतीकरण हा उद्देश लक्षात घेता या माध्यमातून तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व इतर निवडीचे मुख्य काम या अभियानाच्या माध्यमातून केले जाणार असे प्रतिपादन काँग्रेसच्या केंद्रीय प्रभारी नीतू वर्मा यांनी संघटनेचे बळकटीकरण येणाऱ्या काळात काँग्रेसला पूर्वीचे दिवस आणण्यासाठी हे पाहून थेट काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उचलले असून काँग्रेस एक्शन मोडवर आले असून ग्राउंड लेव्हलला जाऊन



प्रत्येकाशी चर्चा करूनच संघटनेला बळ दिले जाणार आहे असे त्यांनी प्रतिपादन केले त्याचबरोबर काँग्रेसचे सहप्रभारी एमएम शेख यांनी जिल्हाभरातील काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याला काँग्रेस पक्ष येणाऱ्या काळात बळ देणार असून सामान्य लोकांना केंद्रीय स्तरावरून पदाधिकारी म्हणून निवडले जाणार असल्याने भविष्यात काँग्रेस शिवाय आता पर्याय राहणार नसल्याचे माजी आमदार एम एम शेख असे उद्गार यांनी आपल्या बोलताना मनोगता मध्ये व्यक्त केले काँग्रेसचे गेवराई तालुका अध्यक्ष महेश बेदरे यांनी प्रास्ताविक भाषणामध्ये बोलताना सांगितले की आगामी काळात गेवराई तालुक्यातील घराघरात काँग्रेसचे संघटन पोचणार असून काँग्रेसचा विचार जनसामान्यात पाठवून काँग्रेसला गेवराई तालुक्यात आगामी काळात सुगीचे दिवस आणू असे ठामपणे आश्वासन दिले आगामी काळात काँग्रेसच्या नेतृत्वाने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे पालन करून काँग्रेसच्या सर्व जुन्या नव्या पद अधिकाऱ्यांना सोबत घेऊन गेवराई तालुका काँग्रेस मय करू असे सांगितले यावेळी काँग्रेसच्या पदे अधिकाऱ्यांचे मत ऐकून घेऊन मान्यवरांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमास राजसंघटन सुजन अभियानच्या बीड जिल्हा प्रमुख मा.श्रीमती नितू वर्मा जी निरीक्षक अ.भा. काँग्रेस कमिटी नवी दिल्ली यांच्या सह मा.एम.एम.शेख (माजी आमदार) मा. सुरेंद्र गोडजकर (संघटन निरीक्षक), जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण कुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे,फरिद देशमुख, बीड तालुका अध्यक्ष गणेश बजगुडे, दत्ता कांबळे, रमेश सानप, सुनील नागरगोजे, गेवराई तालुका अध्यक्ष महेश बेदरे, तालुका उपाध्यक्ष मधुकर, मनोहर चाळक, भारत ढवारे, उमर शेख, जुनेद बागवान,सय्यद सिराज, गणेश कोल्हे, बाळासाहेब साबळे, राजाराम पवार, यांच्यासह काँग्रेसचे शेकडो पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे यांनी केले.



## माजलगाव वकील संघात महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील माजलगाव वकील संघामध्ये क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वकील संघाचे उपाध्यक्ष अॅड.एम.एन.जाधव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वकील संघाचे ज्येष्ठ विधीज्ञ अॅड.एस.के.गोंडे,अॅड. आर.आर.टाकणखार अॅड.साबळे,यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमात अॅड.बलराज शिंदे,अॅड.एम.एन.जाधव यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जिवनाविषयी मनोगत व्यक्त केले.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वकील संघाचे सचिव अॅड.नारायण तेलगड,अॅड.पी.आर.खेत्री, अॅड.विजय मस्के अॅड.अर्जुन शिंदे,अॅड.कोरडे यांनी परिश्रम घेतले.

## जय जवान विद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

**आज दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलित संस्थेचे जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव तालुका वडवणी जिल्हा बीड या विद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पावन प्रतिमेस उपस्थित प्रमुख पाहुणे मान्यवर यांच्या हस्ते व विद्यालयाचे प्राचार्य श्री सारोक्ते डी जी यांच्या हस्ते क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पावन प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले (११ एप्रिल १८२७ - २८ नोव्हेंबर १८९०) हे महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक, विचारवंत, लेखक आणि शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी १८४८ मध्ये पुण्यात मुलींची पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि समाजातील विषमतेविरुद्ध लढा देत शिक्षणाद्वारे क्रांती घडवून आणली.**

स्त्री शिक्षण व सक्षमीकरण: सावित्रीबाई फुले यांच्यासोबत त्यांनी १८४८ मध्ये पुण्याच्या भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. महिलांना सन्मानाने जगण्याचा हक्क मिळावा यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. सत्यशोधक समाज: २४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली, ज्याचा उद्देश खालच्या जातीतील लोकांचे हक्क मिळवणे आणि सामाजिक समानता प्रस्थापित करणे हा होता. अस्पृश्यता व जातिभेद निर्मूलन: त्यांनी अस्पृश्यता, जातिव्यवस्था आणि अंधश्रद्धेवर कडाडून टीका केली. त्यांनी शोषित, पीडित आणि मागासवर्गीय समाजाला समानतेचा मार्ग दाखवला. शेतकरी व कामगार हित: शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी शेतकऱ्याचा आसूड यांसारखे महत्त्वाचे लेखन केले. बालहत्या प्रतिबंधक गृह: विधवा महिलांची दुरवस्था पाहून त्यांनी पुण्यात बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले आणि अनाथ मुलांसाठी आश्रयस्थाने तयार केली. प्रमुख साहित्यिक व वैचारिक कार्य: गुलामगिरी: जातीयतेवर प्रहार करणारे त्यांचे प्रमुख पुस्तक. शेतकऱ्याचा आसूड: शेतकऱ्यांच्या दुर्दशेचे वर्णन. सत्सार, सत्यशोधक समाजोक्त मंगलष्टका, सार्वजनिक सत्यधर्म (त्यांचे अंतिम पुस्तक) सन्मान: त्यांच्या महान कार्याची दखल घेऊन १८८८ मध्ये मुंबईतील एका विशाल सभेत त्यांना महात्मा ही पदवी प्रदान करण्यात आली महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि सामाजिक क्रांतीचे जनक म्हणून कायम स्मरणात राहतील.तसेच विद्यालयातील उपस्थित सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विनम्र अभिवादन केले. अनेक विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनाविषयी कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक वृंद प्रतिष्ठित नागरिक शिक्षण प्रेमी माझी विद्यार्थी संघ आधी सर्व उपस्थित होते. त्याचबरोबर घाडगे सर, टाले सर, हंगे सर, यादव सर ,मुंडे सर, येवले सर ,तर मॅडम, चोपडे सर, पाखरे व्हि.डी , काळे व्हि.डी ससाने जी एम आदी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.शेवटी उपस्थित सर्वांचे ऋणनिर्देश व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता झाली.



**बीड : तालुक्यातील जरुड येथील काळ भैरवनाथ देवस्थान यात्रेनिमित्त सालाबादप्रमाणे यंदाही रथ ओढण्याचा कार्यक्रम शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या शुभहस्ते नारळ फोडून करण्यात आला यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन उपस्थित होते.**

# माजलगावात महात्मा फुले जयंती साजरी; आझाद क्रांती सेनेचा पुढाकार

**माजलगांव । प्रतिनिधी**

**माजलगाव शहरासह तालुक्यात विविध ठिकाणी महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली. सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या आझाद क्रांती सेनेच्या वतीने या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**




यावेळी शहरातील प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे तसेच शाळा व संस्थांमध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आझाद क्रांती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत फुले यांच्या विचारांचे स्मरण केले आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला. कार्यक्रमादरम्यान वक्त्यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेत, त्यांनी शिक्षण, स्त्री-पुरुष समानता व शेतकरी हक्कांसाठी दिलेल्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी युवक-युवतींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. तसेच समाजातील विविध घटकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती कार्यक्रमाला प्रतिसाद दिला.आझाद क्रांती सेनेच्या वतीने अशा सामाजिक व प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.यावेळी सेना प्रमुख राजेश घोडे, तालुका प्रमुख अशोक ढगे, गणेश थोरात,सूरज सावंत, पांडुरंग शिंदे आदी उपस्थित होते.

# गंगामसला येथे 'छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्व अभियान' कार्यक्रम

## जिल्हाधिकारी गैरहजर, आमदारही मधेच निघून गेल्याने चर्चांना उधाण

**माजलगांव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील गंगामसला येथे दि. १० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता 'छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्व अभियान' अंतर्गत महत्त्वपूर्ण शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, जिल्हाधिकारी (कलेक्टर) कार्यक्रमास गैरहजर राहिल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे.**

या अभियानाच्या माध्यमातून महसूल विभागाच्या विविध योजना, सेवा तसेच नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तातडीने तोडगा काढण्याचा उद्देश होता. कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक प्रशासनाने केले असून, उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना योजनांची सविस्तर माहिती दिली. यावेळी अनेक शेतकरी व नागरिकांनी आपल्या समस्या मांडत तत्काळ निराकरणाची मागणी केली.दरम्यान, जिल्हाधिकारी यांच्या अनुपस्थितीबाबत विविध तर्कवितर्क लावले जात असून काहींनी वाळू माफियाच्या भीतीमुळे




ते गैरहजर राहिल्याचा आरोप केला आहे. मात्र, यासंदर्भात अधिकृत स्तरावर कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. याच कार्यक्रमाला उपस्थित असलेले आमदार प्रकाश सोळंके हे कार्यक्रम सुरू झाल्यानंतर काही वेळातच निघून गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे कार्यक्रमाच्या अध्यक्षीय उपस्थितीत खंड पडून काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करत, महत्त्वाच्या शासकीय कार्यक्रमात वरिष्ठ अधिकाऱ्यांची अनुपस्थिती योग्य नाही. यामुळे प्रशासनाबद्दल चुकीचा संदेश जातो, अशी प्रतिक्रिया दिली. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.एकूणच, गंगामसला येथील हा कार्यक्रम नियोजित पद्धतीने पार पडला असला तरी जिल्हाधिकारी यांच्या अनुपस्थिती आणि आमदारांच्या मधल्या काळात निघून जाण्यामुळे कार्यक्रमाला वेगळे वळण मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

पान १ वरून...

### लाडक्या बहिणींना एप्रिल

एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दोन्ही महिन्यांचे पैसे लाडकींच्या खात्यात जमा होण्याची शक्यता आहे. लकवरच सरकारकडून घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू असल्याचे सांगितले जात आहे. लाडकी बहीण योजनेत ज्या लाभार्थी महिला निकषात बसतात त्यांनाच योजनेचा लाभ मिळणार आहे. ज्या महिला निकषात बसत नाहीत, ज्यांनी अद्याप केवायसी केली नाही त्यांना योजनेचा लाभ मिळणार नाही. ज्या लाभार्थी महिलांनी ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण केली नाही त्यांना सरकारने दिलासा दिला आहे. ई-केवायसीसाठी सरकारने ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. केवायसीमध्ये ज्या महिलांकडून चुका झाल्या आहेत त्यांना सरकारने एक संधी दिली आहे. त्यांनी ३१ एप्रिलच्या आत केवायसी करायची आहे. त्यानंतरच त्यांच्या खात्यात योजनेचे पैसे जमा केले जातील. ई-केवायसी करताना लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांनी चुकीचा पर्याय निवडला. 'माझ्या कुटुंबात कोणी सरकारी नोकरीत आहे का?' या प्रश्नाचे उत्तर अनेक महिलांनी चुकीचे सबमिट केले. त्यामुळे त्यांचा मासिक हप्ता आपोआप बंद झाला. या सर्व महिलांच्या तक्रारी आल्यानंतर सरकारने त्यांना दुरुस्ती करण्याची संधी दिली आहे.

--------

### महिलांना सभागृहात आरक्षण देण्याचा निर्णय

शाळा असून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यास हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जागतिक स्तरावर झेप घेण्याची क्षमता निर्माण होत असून काही विद्यार्थिनी इस्रो आणि नासासारख्या संस्थांपर्यंत पोहोचल्याचे सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून या शाळेची उभारणी झाली असून त्यांनी शाळा उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष घातल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी फ्रेंच व जर्मनसारख्या परकीय भाषा आत्मसात केल्या आहेत, हे बदलत्या शिक्षण व्यवस्थेचे द्योतक असल्याचे सांगितले.

------------

### अंगणवाडी सेविका, मदतनिसच्या

भरती होणार आहे. यामध्ये १,१०,६६४ अंगणवाडी सेविका आणि १,१०,६६४ अंगणवाडी मदतनीस अशी एकूण २,२१,३२८ मानधनाधारित पदे मंजूर करण्यात आली आहेत. याशिवाय २८४३ पदे बाह्य यंत्रणेमार्फत भरण्यालाही मंजुरी देण्यात आली आहे. या भरतीमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना रोजगार मिळण्यास मदत होणार असून, बालकांच्या आरोग्य, पोषण आणि शिक्षण सेवांमध्ये सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

------------

### आरटीई प्रवेश लॉटरी

२२९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. तर ८६ हजार ३४ विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना नोंदणीकृत मोबाईलवर प्रवेशासाठी एसएमएस पाठवण्यात येणार आहेत. परंतु पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता संकेतस्थळावरून लॉटरी तपासून प्रवेशासाठी निवड झाली आहे की नाही, याची माहिती घ्यावी.

-------------

### नाशिकमध्ये अपघातानंतर पिकअपने

उपचारासाठी सिन्नर येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. अपघातामध्ये मृत्यू झालेले चौघे जण सिन्नर तालुक्यातील पंचाळे गावातील रहिवासी होते. मृतांवर शोकाकुल वातावरणात अन्त्यसंस्कार करण्यात आले.

-----------

### शंभुराज देसाईंसाठी ४० आमदार एकवटले,

अपघाताला अडीच महिने उलटूनही सत्य समोर आले नसल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच अजित पवारांना न्याय मिळवून देण्यासाठी अमोल मिटकरींनी 'जस्टिस फॉर दादा' आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. अपघातानंतर १५ दिवसांत ब्लॅक बॉक्स डेटा जाहीर करण्याचं आश्वासन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिलं होतं. मात्र, अडीच महिने उलटूनही तो डेटा समोर आलेला नाही. तसेच विमानतळावरील फुटेजही अद्याप जाहीर न झाल्याने संशय अधिक गडद होत असल्याचे मिटकरी यांनी म्हटले. अजित पवारांचे विमानतळावरील गेट नंबर ८ पासून विमानात बसण्यापर्यंतचे फुटेज सार्वजनिक करण्याची मागणी अमोल मिटकरींनी केली आहे. विमानात ६ जण होते की ५, हे स्पष्ट व्हायला हवे, असे मिटकरी म्हणाले. मिटकरी यांनी डिजीसीएच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अपघातानंतर आलेल्या प्राथमिक अहवालात अनेक विसंगती असल्याचा आरोप त्यांनी केला. अपघातस्थळी झाड नव्हते, तरी अहवालात झाड दाखवले, असा दावा त्यांनी केला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर अद्याप गुन्हा दाखल न झाल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

---------

### सोन्याच्या दरात

आहे. तर चांदी प्रति किलो २,६०,००० रुपयांवर पोहोचली आहे. २४ कॅरेट सोन्याचे दर प्रति तोळा ४९० रुपयांनी वाढल्याने भाव १,५२,८४० रुपयांवर पोहोचला आहे. तर २२ कॅरेट सोन्याचा दर प्रति तोळा १,४०,१०० रुपयांवर पोहोचला आहे. १८ कॅरेट सोन्याचा दर प्रति तोळा १,१४,६३० रुपयांवर पोहोचला आहे. मुंबईसह देशभरातील सराफा बाजारात सोन्याचे दर वधारल्याचे समोर आले आहे. मुंबईतील सराफा बाजारात सलग दोन दिवस सोन्याचे दर वाढल्याचे दिसून आले. ऐन लग्नसराईत सोन्याचा दर वाढल्याने ग्राहक आणि गुंतवणूकदारांना जादा दर मोजावा लागणार आहे.

------------

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि.१२ एप्रिल २०२६



## थोडक्यात

### माहेश्वरी सभेच्या अध्यक्षपदी विनोद बजाज तर सचिवपदी पुरुषोत्तम करवा यांची बिनविरोध निवड

माजलगाव । प्रतिनिधी

येथील तालुका माहेश्वरी समाजाच्या तालुका अध्यक्षपदी विनोद बजाज तर सचिवपदी पुरुषोत्तम करवा यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाली.माजलगाव येथील राजस्थानी मंगल कार्यालयात गुरूवार रोजी एका बैठकीत निवड करण्यात आली.




निवडीसाठी राजस्थानी मंगल कार्यालय या ठिकाणी अध्यक्ष उमेश जेथलिया यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.पुढील तीन वर्षांसाठी सर्वानुमते अध्यक्ष म्हणून विनोद बजाज व सचिव म्हणून पुरूषोत्तम करवा यांची निवड करण्यात आली. या बैठकीस माहेश्वरी समाजाचे सर्व सदस्य उपस्थित होते.या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रा.कमलकिशोर लड्डा यांनी काम पाहिले.



क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना सी.ए बी.बी.जाधव जाधव, अशोक सुखवसे, सतिष शिंदे,अशोक येडे, सय्यद सादेक,अजम खान व मित्र परिवार...

# नेकनूरमध्ये कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ११ गायींची सुटका

## एलसीबीचा नेकनूर येथे छापा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने (डउइ) नेकनूर परिसरात मोठी कारवाई केली आहे. कळसंबर रोडवरील गंडाळा परिसरात कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ११ गोवंश जातीच्या गायींची पोलिसांनी सुटका केली असून, याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकी घटना काय?

पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय महेश विघ्ने आणि त्यांचे पथक १० एप्रिल रोजी केज उपविभागात पेट्रोलिंग करत होते. यावेळी कळसंबर रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये आरबाज जलाल पठाण याने कत्तलीसाठी गायी साठवून ठेवल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

अमानुष छळ आणि कारवाई

मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी तातडीने पंचासह सदर ठिकाणी छापा टाकला. यावेळी शेडमध्ये ११ गायींना अत्यंत दाटीवाटीने, चारा-पाण्याची कोणतीही सोय न ठेवता आणि त्यांचे तोंड जमिनीला लागेल अशा पद्धतीने बांधून ठेवल्याचे आढळून आले. या सर्व ११ गायींची किंमत सुमारे ३ लाख १५ हजार रुपये इतकी आहे.

गुन्हा दाखल

याप्रकरणी आरोपी आरबाज जलाल पठाण (रा. नेकनूर) याच्याविरुद्ध नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४२/२०२६ नुसार महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमाच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. जप्त केलेल्या सर्व गायींना बीड येथील कै. तुकाराम गुरुजी गौधाम प्रकल्पात सुरक्षितपणे हलवण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय महेश विघ्ने, महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते आणि गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे.

## जवळा येथे अखंड हरिनाम सप्ताह

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील फकीरजवळा येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. दि. ८ एप्रिल ते दि. १५ एप्रिल पहाटे काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ, रात्री ९ ते ११ कीर्तन, व नंतर जागर, विविध कार्यक्रम आहेत.

भागवत कथा रत्नदीप कुलकर्णी, ज्ञानेश्वरी पारायण अध्यक्ष संत तुकाराम महाराज गुरुकुल जवळा सिद्धेश्वर महाराज सोळंके, तसेच कीर्तन हभप सिद्धेश्वर महाराज सोळंके, हभप प्रमोद महाराज पवार, हभप मारुती महाराज सुरवसे, हभप दत्ता महाराज सोनवणे, हभप गोपाळ महाराज थेटे, हभप उत्तरेश्वर महाराज जाधव, सत्यवान महाराज लाटे व अध्यक्ष संत नारायण बाबा संस्थान वांगी हभप एकनाथ महाराज माने यांचे काल्याचे किर्तनाने सप्ताहची सांगता होणार आहे. तरी प्रंचक्रुशीतील भाविक भक्तांनी यांचा लाभ घ्यावा समस्त गावकरी जवळा.

## घाटनांदुर येथे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी



घाटनांदुर । प्रतिनिधी

येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त घाटनांदुर येथील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले चौक या ठिकाणी दि ११ एप्रिल शनिवार रोजी सकाळी दहा वाजता क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ फोडून विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी सरपंच महेश गारठे, उपसरपंच दत्ता जाधव, गणेश देशमुख, ज्ञानोबा जाधव,दिनकर आरसुडे,दादा वैद्य,शिरूभाऊ आरसुडे, सुरेश जाधव, नारायण आरसुडे, पत्रकार संजय रानभरे, धनंजय जाधव परमेश्वर वैद्य,रवी आरसुडे, पवन दरगड, विलास शिनगारे, उत्सव जाधव, राहुल कासारे,चंदू आव्हाड, मंगेश रासवे, गणेश आरसुळे, महादेव कांबळे,बाळकृष्ण आरसुडे राहुल अडसुडे व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्त्री शिक्षणाचे प्रणेते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा सर्वांनी आदर्श घ्यावा -सौ.शीलाताई उजगरे

वडवणी । प्रतिनिधी

मौजे पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड येथे ,,छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड, येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती फार मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणामध्ये साजरी करण्यात आली ..सर्वप्रथम क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन वाचनालयाचे सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर व ग्रंथपाल सौ सीलाताई सुखदेव उजगरे यांनी केले. याप्रसंगी शाळेतील बऱ्याच विद्यार्थी विद्यार्थिनीने महात्मा फुले यांच्या जीवनावर आपले अनमोल विचार मांडले.. त्यानंतर ग्रंथपाल सौ.शिलाताई सुखदेव उजगरे ,यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, सर्वांसाठी शिक्षण हे किती महत्त्वाचे आहे ,शिक्षणामुळे, ज्ञानामुळे कशाप्रकारे प्रगती साधली जाते, व मानवाचा विकास शिक्षणामुळेच होतो हे सर्वप्रथम जर कोणी जाणले असेल तर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी जाणले होते.. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाबरोबरच सर्वांच्या शिक्षणाचा सर्वतोपरी विचार केलेला आहे ..उच्च वर्णयातील शिक्षक वर्ग हा कोणालाही शिकवण्यास तयार नव्हता.. आणि शिक्षकच जर नसतील तर मग विद्यार्थी कसे घडतीलड हा विचार सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांनी केला ..त्यांनी स्वतःच्या घरातूनच शिक्षण द्यायला सुरुवात करण्याचा निश्चय



केला.. आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना त्यांनी सर्वप्रथम शिक्षणाकडे वळवले.. सर्वप्रथम महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षण दिले.. त्यांना प्रशिक्षित केले .. कोणालाही न जुमानता त्यांनी पुण्यासारख्या भिडे वाड्यातील मुख्य ठिकाणी मुलींचे वर्ग सुरू केले.. तेव्हापासून खऱ्या अर्थाने शिक्षणाला सुरुवात झालेली आहे ..सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी खऱ्या अर्थाने सर्वांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिलेली आहे ..व पुढे छत्रपती शाहू महाराज यांनी शिक्षणासंबंधी मौलिक कार्य करून सर्वांना शिक्षण सक्तीचे केले.. पुढे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिबा फुले यांचा वारसा घेतला .. महात्मा फुले सारख्या विद्वान व्यक्तींना गुरु मानून सर्वांसाठी समान शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली ..यामुळे सर्व समाजाची प्रचंड प्रगती झालेली आहे.. आज सर्व स्त्रिया व पुरुष मंडळी फार मोठ्या प्रमाणामध्ये शिक्षण घेऊन आपली उन्नती करीत आहे.. खऱ्या अर्थाने अशा महान विचारवंताचे कार्य सतत सर्वांनी जोपासणे आवश्यक आहे.. व त्यांच्या कार्याची ओळख सर्वांनी करून घेणे गरजेचे आहे व त्यांच्या विचाराप्रमाणे सर्वच जाती-धर्मातील लोकांनी वागणे गरजेचे आहे.. म्हणून वाचनालयातील विद्यार्थ्यांनी महापुरुषांचे विचार जास्तीत जास्त आत्मसात करावेत.. वाचनातील साहित्याबरोबरच महापुरुषांच्या विचाराचा वारसा आपल्या घराघरांमध्ये जपावा.. आणि आपली आपल्या कुटुंबाची आपल्या देशाची प्रगती करण्यासाठी सतत प्रयत्न करावे ..असे प्रतिपादन आयु.सौ. शीलाताई सुखदेव उजगरे यांनी याप्रसंगी केले.. यानंतर सदरील कार्यक्रमांमध्ये विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी राम माळी हिचा वाढदिवस या कार्यक्रमांमध्ये साजरा करून तिलाही वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.. यानंतर खळगे सर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले ..व सर्वांना अल्प उपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली ..या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक शालेय विद्यार्थी व आजूबाजूच्या परिसरातील मान्यवर मंडळी उपस्थित होते.

## श्री विठ्ठल रुक्माई मंदिर वर्धापन दिनानिमित्त आंबिका चौक येथे अखंड हरिनाम सप्ताह

### बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे सोमवारी भक्तिमय कीर्तन

बीड । प्रतिनिधी

शहरातील आंबिका चौक येथे श्री विठ्ठल रुक्माई मंदिर वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने सोमवार, दि. १३/०४/२०२६ रोजी बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांची विशेष कीर्तन सेवा संपन्न होणार आहे.

श्री विठ्ठल रुक्माई मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये भजन, हरिपाठ, प्रवचन तसेच अखंड हरिनाम संकीर्तन यांचा समावेश आहे. संपूर्ण सप्ताहभर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून 'राम कृष्ण हरी'च्या जयघोषाने परिसर दुमदुमणार आहे.

या कीर्तन सेवेत बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते हे भक्तांना भक्तीमार्ग, नामस्मरणाचे महत्त्व आणि संत परंपरेतील शिकवण यावर मार्गदर्शन



करणार आहेत. त्यांच्या सुमधुर वाणीतील कीर्तनामुळे भाविकांना आध्यात्मिक अनुभूती मिळणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक भाविक, महिला मंडळ, युवक मंडळ तसेच श्री विठ्ठल रुक्माई मंदिर समितीचे सदस्य परिश्रम घेत आहेत. तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे बीड शहरात धार्मिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचे सुंदर दर्शन घडणार असून भक्तीमय वातावरणात संपूर्ण परिसर उजळून निघणार आहे.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये संस्था सचिव योगेश भैय्या क्षीरसागर व गटनेत्या सारिका ताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेचे मु.अ. मोरे सर यांच्या हस्ते करण्यात आले

प्रतिमापूजन नंतर आपले मनोगत व्यक्त करताना श्री मोरे सर यांनी व्यक्त केले की क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीचे हे द्विशताब्दी वर्ष आपण साजरा करत आहोत दोनशे वर्षापूर्वी या महामानवाचा जन्म झाला. भारत देशाच्या इतिहासात एक क्रांतिकारक स्थित्यंतर म्हणून त्यांच्याकडे पहावे लागेल महात्मा ज्योतिराव फुले यांचे जीवन कार्य म्हणजे भाषणाचा किंवा



व्याख्यानाचा विषय नसून तो जगण्याचा विषय आहे .मानव मुक्तीचा लढा हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे माणसाला माणूस बनवणे ही त्यांच्या विचारांची मध्यवर्ती भूमिका होती. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ त्यांच्या हाताने त्यांनी रोवली होती .पूरोगामी विचारांचे ते कृतिशील ऊर्जा केंद्र होते. अशा या महामानवास वंदन आपल्या भाषणातून केले. विशेष बाब म्हणून अनिष्ट रूढी परंपरा यांना विरोध करण्यासाठी व अंधश्रद्धेला मूठमाती देण्यासाठी क्रांतीसुर्याने घडवून आणलेला नाव्ह्याचा संप याबाबत विश्लेषण करताना विधवा स्त्रियांसाठीचे कार्य विशद केले. विद्यार्थ्यांनीही महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवन कार्यावर भाषणे केली. अशा पद्धतीने अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात क्रांतीसूर्याची जयंती साजरी करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री माताडे सर यांनी केले व कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने श्रीमती वीर मॅडम यांनी केला यावेळी कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी श्रीमती गायके मॅडम व आशाबाई लवांडे यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह शाळेतील पालक वर्ग उपस्थित होता

## दिव्यांग बांधवाच्या हक्कांच्या ५% निधी करीता शिवसेना आक्रमक भूमिकेत!

गेवराई । प्रतिनिधी

दिव्यांग व्यक्तींच्या हक्काच्या ५% निधीची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने नगरपालिकेला निवेदन देण्यात आले आहे. निधीचा वापर दिव्यांगांच्या कल्याणासाठी व पुनर्वसनासाठीच करावा, अशी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाध्यक्ष अजय दाभाडे युवा नेते राजू शेख यांच्याकडून मागणी केली जात आहे. शिवसेनेच्या वतीने नगरपालिकेला दिव्यांग निधीसाठी नगरपरिषदेकडे ५% स्वेच्छा निधी) देण्यात येणाऱ्या निवेदन प्रामुख्याने दिव्यांगांच्या हक्काच्या निधीचे वाटप तात्काळ व्हावे या मागणीसाठी देण्यात आले आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या वतीने हे



निवेदन सादर करण्यात आले की, शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी (नगरपरिषद) आपल्या स्व-उत्पन्नातील ५% निधी हा दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राखून ठेवणे आणि तो खर्च करणे अनिवार्य आहे. नगरपालिकेकडून या निधीचा विनियोग योग्य रीतीने होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक दिव्यांग बांधव आजही विविध सरकारी योजनांपासून आणि आर्थिक मदतीपासून वंचित आहेत.या निवेदनात प्रामुख्याने दिव्यांगांच्या विविध योजना, शिक्षण, स्वयंरोजगार, आणि वैद्यकीय उपकरणांसाठी या निधीचा वापर पारदर्शकपणे व्हावा, अशी मागणी करण्यात आली आहे, जेणेकरून पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेल. यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हा आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे.

पान ६ वरुन...

### मराठा सेवा संघातर्फे प्राजक्ताताई

होऊन मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.हे तीनही पुरस्कार आज दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी आष्टी येथील राजमाता जिजाऊ विद्यार्थी वस्तीगृह लोकार्पण सोहळा कार्यक्रमाच्या वेळी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांच्या उपस्थितीमध्ये देण्यात येणार आहेत . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष इंजिनिअर विजय घोगरे हे राहणार आहेत. यावेळी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, मराठवाडा भूषण आ.सुरेश धस, आ.सतीश भाऊ चव्हाण, इंजि.नवनाथ घाडगे, शिवश्री अर्जुनराव तनपुरे, शिवश्री मनोज दादा आखरे, शिवमती सीमाताई बोके,माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर,माजी आ. बाळासाहेब आजबे काका यांचेसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पंचक्रोशीतील प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर ,इंजिनिअर, वकील व समाजाच्या सर्व थरातील कार्यकर्त्यांनी या लोकांपर्यंत लोकार्पण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन इंजि.तानाजी जंजिरे, भास्करराव निंबाळकर, लक्ष्मण रेडेकर,प्रा. डॉ.बाबासाहेब मुटकुळे ,प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे, प्राचार्य शशिकांत कन्हेरे, सुरेश पवार सर, बन्सीधर मोरे , ॲड सीताराम पोकळे आदी मान्यवरांनी केले आहे.

### महात्मा फुले यांनी शिक्षणाची दारे

यो.शि.संस्था परिसरातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

उपनगराध्यक्ष दिनेश भराडीया,सय्यद ताहेर नगरसेवक महेश कदम, महेश लोमटे,आकाश कराड,अकबरखाँ पठाण,दत्तात्रय सरवदे,माजी नगरसेवक गणेश मसने,सुनील वाघाळकर,यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### धाबा चालकाकडून गावठी

करण्यात आले आहे.

यांनी केली कारवाई

ही यशस्वी कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक (अंबाजोगाई) श्रीमती चेतना तिडके, आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकामध्ये पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, अंमलदार गोविंद भताने, रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णू सानप, सचिन आंधळे, विकी सुरवसे, अतुल हराळे आणि विकास राठोड यांचा समावेश होता.

### योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या

माहिती सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांना समजले असता त्यांनी थेट शाळा गाठत याबाबत चौकशी केली. यानंतर शाळेत जात त्यांनी माहिती घेतली असता शाळेत एस.आय.एन.चर्च नाव असलेल्या कपाटात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणारी पुस्तके, जादूटोण्याच्या वस्तू, आणि नशेची औषध असल्याचा दावा यावेळी करण्यात आला.सदरील प्रकार शिक्षकांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने होत असल्याचा त्यांनी सांगितलं. शाळेचा सबंध नसलेली गायकवाड नावाची व्यक्ती दर रविवारी ख्रिश्चन धर्माची प्रार्थना घेत असल्याचे असून गेल्या १५ वर्षापासून हा प्रकार सुरू असल्याचे सांगण्यात आले.दरम्यान याबाबत शनिवारी सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कार्यालयात जात संस्थाचालकांना याचा जाब विचारत या प्रकरणात सहभागी असलेल्यांवर पुढील दोन दिवसात कारवाईची मागणी केली.तसेच संस्थेशी संबंध नसलेल्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात यावा. ही कारवाई न झाल्यास संस्थेसमोर धरणे आंदोलन,आत्मदहन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालय,गटशिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आले.

## साहित्याने समाजमनाला आकार दिला : शहाजिंदे

### शांतीवनातील मराठवाडा साहित्य संमेलनाचा भावनिक वातावरणात समारोप

स्व. बाबा आमटे साहित्य नगरी, आर्वी

बोलणे एक आणि वागणे दुसरे अशी तफावत समाजात रुजली आहे. घटनेवर सारेच बोलतात मात्र प्रत्यक्ष आचरण घटनेच्या तत्वानुसार कोणीच करत नाहीत. मग आपल्या बोलण्या आणि वागण्यातच तफावत असेल तर सामाजिक एकता संपली, बंधुभाव संपला हे बोलण्याचा आपल्याला अधिकार नाही, असे सांगत साहित्याने समाज मनाला आकार दिला. साहित्यामुळे समाजात प्रगल्भता आली,असे विचार संमेलन अध्यक्ष फ. म. शहाजिंदे यांनी समारोपीय भाषणात मांडले. शांतीवन प्रकल्पाने केलेल्या पाहुणचाराने भारावून गेल्याचेही त्यांनी सांगितले.

मराठवाडा साहित्य परिषद आणि भवानी विध्यार्थी कल्याण प्रतिष्ठान, शांतीवन आर्वी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ४५ व्या मराठी साहित्य संमेलनाचा शनिवारी (दि.११) सायंकाळी समारोप झाला. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष प्रा. फ. म. शहाजिंदे, कौतिकराव ठाले, आसाराम लोमटे, रामचंद्र तिरुके, दीपा क्षीरसागर, रामचंद्र काळुंखे, डॉ. अशोक बेलखोडे, गणेश मोहिते, दीपक नागरगोजे, भास्कर बडे, कावेरी नागरगोजे यांच्यासह साहित्यिक, कवी आणि साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील म्हणाले, सामाजिक काम हे विस्तवावरून चालण्यासारखे आहे. कारण समाजाची परिस्थिती खूप विदारक बनत आहे. अशा परिस्थितीत मराठवाडा साहित्य संमेलनात भीषण सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारे परिसंवाद ठेवले. संमेलनात अशी चर्चा ठेवणे धाडसाचे असते. हे धाडस साहित्य परिषदेने केले असे सांगत ठाले पाटील यांनी शांतीवन प्रकल्प आणि दीपक नागरगोजे यांच्या कामाचे तोंडभरून कौतुक केले. शांतीवन येथे झालेल्या या ४५ व्या संमेलनाने आम्हा साहित्यिकांचा आणि मराठी साहित्य परिषदेचा गौरव वाढवला. शांतीवन येथील संमेलन आणि येथील पाहुणचार दीर्घाकाल स्मरणात राहील असे ठाले पाटील शेवटी म्हणाले. संमेलनाचे अध्यक्ष फ. म. शहाजिंदे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले, संमेलनाचा अध्यक्ष कधी होईल असे वाटले नव्हते. परंतु, माझ्या अध्यक्षतेखाली झालेले संमेलन शांतीवन सारख्या पवित्र ठिकाणी आणि यशस्वी झाले, याचा खूप आनंद आहे. जावयाची सासुरवाडीत व्यवस्था व्हावी तशी आम्हा साहित्यिकांची येथे झाली. संमेलनातील आजचे दोनही परिसंवाद ऐकूण भारावून गेलो. आजची पिढी एवढी बिनधास्त आणि सडेतोड बोलते आहे, हे एकूण आनंदित झालो. मुसलमान म्हणून माझी कितीही अवहेलना झाली तरी त्याचे काही वाटत नाही. कारण सुड घेणारे आपल्याच भावंडांचा सूड घेत आहेत. सर्वाना समता, सामान संधी आणि बरोबरीचा मान पाहीजे. सामान संधी हवी असेल तर आचरण घटनावादी ठेवा ? असे संमेलनाध्यक्ष शहाजिंदे म्हणाले. समारोपिय भाषणात त्यांनी प्रखर आणि अभ्यासपूर्ण विचार मांडले. यावेळी साहित्यिक, कवी आणि साहित्य प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंतांचा सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

खेलो इंडिया स्पर्धेत मल्लखांब प्रकारात रौप्य व कांस्य पदक मिळवणारी कु. ज्ञानेश्वरी नितीन धनवे तसेच पवार कावेरी कल्याण (पुणे शहर पोलीस), तांबे प्रियंका मल्हारी (अहिल्यानगर पोलीस), कदम हर्षदा बबन (पुणे शहर पोलीस), जासूद निकिता मधुकर (बीड पोलीस), भरत शिवाजी शेलार (पिंपरी-चिंचवड पोलीस), यश चंद्रहार कारंडे (पालघर पोलीस), निलेश अशोक गव्हाणे (वर्धा पोलीस), कृष्णा अशोक भोगाडे (पुणे शहर पोलीस), बडे दशरथ मधुकर (पुणे शहर पोलीस), झगडे सचिन सूर्यभान (आर्मी), वैभव मच्छिंद्र काकडे (अहिल्यानगर पोलीस), मुस्कान जहांगीर शेख (महसूल सहाय्यक) ,माजी ग्रामपंचायत सदस्य श्री. संजय गळगटे यांचे सुपुत्र चि. श्रीराम संजय गळगटे यांची पुणे शहर पोलीस दलात निवड यांचा समावेश आहे. तसेच धोंडे कैलास (ग्रामसेवक) यांची कन्या कु. वैष्णवी कैलास धोंडे (आष्टा, ह.ना.) हिची ढवड कंपनी, मुंबई येथे निवड झाली आहे. या सर्वांचा सत्कार करून अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# युरोपीय देशांना बासमती आणि बिगर-बासमती तांदळाच्या निर्यातीस परवानगी

## केंद्राचा मोठा निर्णय, ६ महिन्यांसाठी तपासणी प्रमाणपत्राची अट शिथिल

दिल्ली / वृत्तसंस्था

भारताने काही युरोपीय देशांना तांदूळ निर्यात करण्यासाठी अटी शिथिल केल्या आहेत. केंद्र सरकारने काही युरोपीय देशांना बासमती आणि बिगर-बासमती तांदळाच्या निर्यातीस परवानगी दिली आहे. त्यासाठी अनिवार्य असलेल्या निर्यात तपासणी एजन्सीच्या प्रमाणपत्राची आवश्यकता लागणार नाही. सहा महिन्यांसाठी ही सूट असेल, असे सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे.

या तपासणी प्रमाणपत्राची अट केवळ युरोपियन युनियनचे सदस्य देश, ब्रिटन, आइसलँड, लिक्टेनस्टाइन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड यांच्यापुरती मर्यादित राहील. तसेच इतर सर्व युरोपीय देशांना यातून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सूट देण्यात आली आहे. केवळ युरोपियन युनियन, ब्रिटन, आइसलँड, लिक्टेनस्टाइन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड या देशांमध्ये तांदूळ निर्यातीसाठी निर्यात तपासणी परिषद अथवा निर्यात तपासणी संस्थेकडून तपासणी प्रमाणपत्र मिळवणे अनिवार्य राहील. इतर युरोपीय



देशांना केल्या जाणाऱ्या तांदळाच्या निर्यातीसाठी सहा महिन्यांच्या कालावधीत या अटीतून सूट देण्यात आली आहे, असे परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने अधिसूचनेत स्पष्ट केले आहे. जगभरातून मागणी वाढत असल्याने तांदूळ निर्यातीला चालना देण्याचा यामागील उद्देश आहे.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी याआधी सांगितले होते की, २०१४ ते २०२५ दरम्यानच्या कालावधीत तांदूळ निर्यातीत ६२ टक्के वाढ झाली आहे. यातून जागतिक अन्न बाजारात भारतीय तांदळाला वाढलेली मागणी अधोरेखित होते. भारत हा जगातील तांदळाचा सर्वात मोठा निर्यातदार देश आहे.

सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या काही वर्षांत जागतिक तांदूळ निर्यातीत भारताचा हिस्सा ३० ते ३५ टक्के एवढा राहिला आहे. तांदूळ निर्यातीचे एकूण मूल्य २०२०-२१ मधील ८.८२ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये १२.४७ अब्ज डॉलर्सवर गेले. २०२४-२५ या वर्षात भारतीय तांदळाला सौदी अरेबिया, इराक, इराण, संयुक्त अरब अमिराती आणि टोगो या देशातून अधिक मागणी राहिली. भारताने निर्यातीला चालना देण्यासाठी निर्बंध हटवले आहेत. यामुळे गेल्या वर्षी भारतातून होणारी तांदळाची निर्यात १९.४ टक्क्यांनी वाढली आहे.

## असे करा हुमणी भुंग्याचे नियंत्रण

हुमणी कीड किती विध्वंसकारी आहे हे आपण सर्वच जाणतो. या किडीची भुंगेऱ्यांची अवस्था साधारणपणे मे-जून महिन्यात बाहेर येते. परंतु नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे सध्या हुमणीच्या भुंगेऱ्यांसाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. त्यामुळे वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. इंग्रजीमधील प्रीकॉशन इज बेटर दॅन क्युअर या म्हणीप्रमाणे हुमणी किडीच्या नियंत्रणापेक्षा भुंगेऱ्यांचे व्यवस्थापन कधीही फायदेशीर ठरते. हुमणी किडीची अंडी, अळी कोष या तीन अवस्था जमिनीमध्ये असतात तर प्रौढ भुंगेरे ही अवस्था जमिनीवर म्हणजेच झाडांवर आढळते. मादी भुंगेरे एकेरी पद्धतीने ओलसर जमिनीत ७ ते १२ सेंमी खोलीवर अंडी घालतात. ही अंडी साबुदाण्यासारखी लांबट आणि गोल असतात. त्यामुळे भुंगेऱ्यांचे नियंत्रण करणे म्हणजे पुढील पिढीवर आळा घालण्यासारखे आहे. तसेच भुंगेरे जमिनीच्या वर असल्याने त्यांचे नियंत्रण करणे सोपे जाते.

पोषक हवामान : सध्या भुंगेरे बाहेर येण्यासाठी पोषक वातावरण आहे असे म्हणतो. म्हणजेच जमिनीत ओलावा, जमिनीचे तापमान आणि पाऊस सध्या या तिन्ही गोष्टी एकमेकांमध्ये सांगड घालत आहेत. जसे, पावसानंतर जमिनीतील ओलावा वाढतो, तसेच जमिनीचे तापमान वाढल्याने भुंगेरे बाहेर पडतात.

भुंगेऱ्यांवरील उपाय : हुमणीचे भुंगेरे सायंकाळी ७ नंतर शेताजवळीच्या निंब, बोर, पेरू, बदाम, जांभूळ, बाभूळ, उंबर व इतर वनस्पतींवर राहतात. या झाडांवर भुंगेरे दिसू लागताच झाडाखाली एक प्रकाश सापळा एकरी १ या प्रमाणे लावावा. प्रकाश



सापळ्यात अडकलेले भुंगेरे डिझेलमिश्रित पाण्यात टाकून नष्ट करावेत. किंवा कडुनिंब सारख्या झाडाखाली विजेचा बल्ब लावून त्याखाली पसरट भांडे ठेवून किंवा वाफा बनवून त्यात रॉकेल मिसळलेले पाणी टाकावे. विजेच्या प्रकाशाकडे भुंगेरे आकर्षित होऊन पाण्यात पडून मरतात. ही प्रक्रिया शेतकऱ्यांनी सामूहिकपणे केल्यास भुंगेऱ्यांचे उत्तम नियोजन होते. यासोबत प्रकाश सापळ्याशेजारी कामगंध सापळे एकरी ४ प्रमाणे वापरून त्यात हुमणीचा ल्यूर वापरावा. यामुळे भुंगेऱ्यांचा प्रभावी बंदोबस्त होतो.

एरंडीच्या बियांचा सापळा : एरंडी बियांचा सापळा भुंगेऱ्यासाठी प्रभावी सापळा ठरतो. यातील मिश्रणाकडे भुंगेरे आकर्षित होतात आणि मरुन जातात. एरंडी बिया १ किलो (बारीक), यीस्ट पावडर ५० ग्रॅम, बेसन पीठ ५० ग्रॅम, ताक अर्धा लिटर हे सर्व मिश्रण २ लिटर पाण्यामध्ये भिजवून २ ते ३ दिवस आंबवून घ्यावे. तयार मिश्रणाची ५ लिटर क्षमतेचे मातीचे मडके एकरी ५ मडकी या प्रमाणे मातीमध्ये ठेवावे. याकडे भुंगे आकर्षित होतात. अशाप्रकारे पाऊस पडल्यावर आणि पोषक वातावरण तयार झाल्यावर भुंगेऱ्यांचे नियंत्रण करण्यासाठी घाई करावी. याशिवाय हुमणीच्या नियंत्रणासाठी खरिपातील पेरण्या करतानाच योग्य जैविक आणि रासायनिक फवारण्या कराव्या.

## थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी 'एकरकमी कर्ज परतफेड' योजना ; कर्जबोजा कमी करण्याची संधी

राज्य सरकारने शेती आणि सहकार क्षेत्राला आर्थिक दिलासा देण्यासाठी नवा निर्णय घेतला आहे. अनेक वर्षांपासून थकीत असलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ३० जून २०२३ पर्यंत थकीत असलेली पिककर्जे तसेच मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे समाविष्ट करण्यात आली आहेत. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे कर्जदारांना फक्त कर्जाची मूळ रक्कम (मुद्दल) भरावी लागणार असून, त्यावरील दंड व्याज व इतर प्रशासकीय शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहेत. थकबाकीमुळे शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळणे कठीण होते, त्यामुळे ते खासगी सावकारांच्या जाळ्यात अडकतात. मात्र, या नव्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत पीककर्ज पूर्णपणे फेडणाऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ नवीन पीक कर्ज मिळणार आहे. तर मुदत कर्ज फेडल्यानंतर एक वर्षात शेतकरी पुन्हा कर्ज घेण्यास पात्र ठरणार आहेत.

योजनेचा उद्देश : या योजनेचा मुख्य उद्देश थकबाकीदार शेतकऱ्यांना दिलासा देणे, त्यांचा पतदर्जा सुधारणे, कर्जवसुलीला गती देणे, कर्ज तफावत कमी करणे आणि सहकारी संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा आहे.

योजनेचे फायदे : पिककर्जावर



सवलतीनंतर ६% व्याजदर मिळतो. मध्यम व दीर्घ मुदत कर्जावर ८% व्याजदर मिळतो.

योजनेच्या अटी : प्रत्येक कर्ज खात्यासाठी स्वतंत्र अर्ज आवश्यक आहे. अर्ज करताना थकबाकीच्या १०% रक्कम जमा करणे बंधनकारक असेल. उर्वरित रक्कम मंजुरीनंतर निश्चित मुदतीत भरावी लागेल. कर्जावरील दंड व्याज व इतर शुल्क माफ असेल. केवळ मुद्दलाची रक्कम भरणे आवश्यक असेल. संस्था योजना स्वीकारल्यानंतर १ महिन्याच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे. योजना सुरुवातीला १ वर्षासाठी लागू असेल.

योजनेच्या पात्रता : ३० जून २०२३ पर्यंतची थकीत पिककर्जे व मध्यम/दीर्घ मुदतीची कर्जे पात्र असतील. मयत कर्जदारांच्या वारसांनाही अर्ज करता येईल. एकापेक्षा अधिक कर्जखाती असल्यास सर्व खाती पात्र असतील.


अर्ज व मंजुरी प्रक्रिया : प्रत्येक कर्ज खात्यासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक. अर्ज करताना थकबाकीच्या १०% रक्कम जमा करणे आवश्यक. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडावी. विकास संस्थांकडून अर्जांची छाननी केली जाईल. प्रस्ताव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे पाठवला जाईल. बँकेकडून अर्जाची मंजुरी दिली जाईल. मंजुरीनंतर उर्वरित रक्कम निश्चित मुदतीत भरावी. त्यानंतर कर्ज खात्याची नियमित नोंद व प्रक्रिया पूर्ण केली जाईल. दरम्यान, या योजनेमुळे शेतकऱ्यांचा पतदर्जा सुधारेल, कर्जवसुली वाढेल आणि सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती अधिक सक्षम होईल. ही योजना पुढील एक वर्षासाठी लागू असून, शेतकऱ्यांनी स्थानिक संस्थांशी संपर्क साधून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आफ्रिकन शेळी पालन करुन कमवू शकता लाखो रुपये

बोअर शेळी ही शेळीची एक जात आहे जी १९०० च्या दशकाच्या सुरूवातीस दक्षिण आफ्रिकेत विकसित झाली होती आणि मांस उत्पादनासाठी ही एक लोकप्रिय जाती आहे. या जातीचे नाव डच शब्द 'बोअर' ठेवण्यात आले होते ज्याचा अर्थ शेतकरी असा आहे. बोअर शेळ्यांचे शरीर सामान्यत: पांढरे तर डोके तपकिरी रंगांचे असते. काही बोअर शेळ्या पूर्णपणे तपकिरी किंवा पांढऱ्या रंगाच्या असू शकतात आणि त्यांच्या शरिरावर भिन्न रंगाचे मोठे डाग असू शकतात. न्युबियन शेळीप्रमाणे, त्यांचे कान लांब आणि हेलकावे घेणारे असतात. या शेळ्या वेगवान आणि प्रजनन दर जास्त असण्यासाठी प्रख्यात आहेत.

वैज्ञानिक वर्गीकरण आणि वैशिष्ट्ये : किंगडम ॲनिमलियाऑर्डर आर्टिओडॅक्टिलियाबोविडेकॅपरा हरकस बोअर शेळ्यांबद्दल रोचक तथ्य या जातीच्या जवळजवळ सर्वच शेळ्यांचे पांढरे शरीर आणि लाल डोके असते. शेळ्यांचे कान लांब असतात आणि ते त्यांच्या डोक्यापासून लटकल्यासारखे भासतात. शेळ्यांची बोअर शिंगे जाड आणि मागे वक्र होत जातात. शेळ्यांचे डोळे तपकिरी असतात. प्रौढ नर बोअर शेळ्यांचे वजन १६० किलोच्या आसपास असते. प्रौढ मादी बोअर शेळ्यांचे वजन साधारणत: ८५ ते १२० किलोच्या आसपास असते. शेळ्यांचा वाढीचा दरच केवळ जास्त आहे असे नाही तर तर त्यांच्यात प्रजनन दरदेखील जास्त असतो. बोअर शेळ्यांचे सरासरी आयुष्य ८ ते १२ वर्षांदरम्यान असते.

शेळीचे बोअर फायदे : बोअर शेळ्या पाळण्याचा फायदा म्हणजे मांस उत्पादन आहे. बोअर शेळ्या शांत स्वभावाच्या असतात.



तोटे : बोअर शेळ्या दणकट असतात असे मानले जाते परंतु गरम वातावरणात या प्राण्यांचे संगोपन करताना काही शेळ्यांना अंतर्गत परजीवींच्या वाढीव संघर्षाचा सामना करावा लागू शकतो. या जातीच्या शेळ्या खरेदी करताना अशा मोठ्या प्राण्यांना ठेवण्यासाठी लागणारी जागा आणि त्यांना खायला देण्याची किंमत या गोष्टींचा विचार केला पाहिजे. बोअर शेळ्यांच्या आरोग्याची आणि पौष्टिक गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारे महाग खाद्य, त्यामुळे त्यांचे पालन करण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागतात.

शेळी बोअर शेळ्यांचा इतिहास : बोअर जातीचे नाव 'बोअर' हा एक डच शब्द आहे ज्याचा अर्थ शेतकरी आहे. या मोठ्या आणि दणकट शेळ्या इतक्या मजबूत आहेत की त्यांचा मूळ समुदाय दक्षिण आफ्रिकेत एकेकाळी पॅक पशू म्हणून उपयोग केला जाई. बोअर शेळ्या १९०० च्या सुरुवातीच्या काळात डच शेतकऱ्यांनी विकसित केल्या. या शेळ्यांच्या मांसाच्या फायद्यामुळे सुरुवातीपासूनच, बोअर शेळ्या मांस आणि डेअरी उत्पादनासाठी राखीव ठेवल्या जात असत. या शेळ्यांनी जो एक द्रुत वाढीचा दर दर्शविला, त्यामुळे त्यांना पाळणाऱ्या डच शेतकऱ्यांना एक वरदान मिळाले असे मानले जात असे.

या शेळीच्या प्रजाती प्रथम दक्षिण आफ्रिकेत दिसल्या, ऑस्ट्रेलियन आणि न्यूझीलंड कृषी कंपन्यांनी शेळीपालन करण्यासाठी झिम्बाब्वेमार्गे बोअर आणि अंगोरा शेळ्यांची थोड्या थोड्या प्रमाणात देशातून बाहेर तस्करी केली. बोअर शेळी खाद्य बोअर शेळ्या सहसा तणांच्या वनस्पती खातात. यामुळे शेतकर्यांना गायी, मेंढ्या व शेळी यांच्यात चरण्याचे क्षेत्र बदलणे सोपे होते. महत्त्वाची बाब म्हणजे जनावरांना चारा घालण्याचे क्षेत्र संपणार नाही याची काळजी घ्यावी. याची खात्री करण्याचा एक मार्ग म्हणजे क्रॉप रोटेशन. कोरड्या आणि थंड हंगामात जनावरांना खाण्यास पुरेसे आहे याची खात्री करण्यासाठी, वेगवेगळ्या हंगामात वाढणारी रोपे वाढवा. कळपाचे संरक्षण करणारे कुंपण देखील समायोजित केले जाऊ शकते किंवा जनावरांना नवीन परिसरात हलविले जाऊ शकते ज्यामध्ये अद्याप रोपे आहेत.

आहार : हिवाळ्यातील किंवा दुष्काळाच्या वेळी शेळ्यांच्या आहारात गवत आणि धान्य जोडले जाऊ शकते. वजन कमी करण्यासाठी धान्य अनेकदा वापरले जाते; तथापि, जनावरांना जास्त प्रमाणात खाण्याची काळजी घ्या कारण यामुळे अवयवांच्या सभोवतालची चरबी वाढते. गवत ताज्या वनस्पतींमध्ये भिन्नता जोडते जी बॅक्टेरिया आणि जंतू कमी करण्यास मदत करते. हे हानिकारक जीव पानांच्या ओलाव्यामध्ये राहतात आणि कोरड्या पानांवर टिकू शकत नाहीत.

बोअर शेळ्यांची संगोपन फायदेशीर आहे का : शेतकरी बोअर शेळ्यांना वाढवणे पसंत करतात, कारण बोअर शेळी ही सर्वात फायदेशीर शेळी पैकी एक आहे.




### महत्वाच्या घटना

१६६१ : प्रिन्स सेसी या शास्त्रज्ञाने प्रथमच दुर्बिणीसाठी टेलिस्कोप ही संज्ञा वापरली.
१६६५ : सुप्रसिद्ध पुरंदरच्या वेढ्यामधे दिलेरखान पठाणने वज्रमाळ किल्ला जिंकला.
१७३६ : चिमाजीअप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.
१८६५ : जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसर्या दिवशी मृत्यू पावला.
१९१२ : आर.एम.एस. टायटॅनिकची हिमनगाशी टक्कर. बोटीला भगदाड पडून बुडु लागली.
१९४४ : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.
१९४४ : मुंबई गोदीत उभ्या असलेल्या 'फोर्ट स्टिकिन' या मालवाहू जहाजावर दुपारी ४ वाजुन ५ मिनिटांनी भीषण स्फोट होऊन ३०० जण ठार झाले आणि (त्याकाळच्या) सुमारे २ कोटि पौंडा इतके आर्थिक नुकसान झाले.
१९८६ : बांगलादेशमध्ये १ किलो वजनाच्या अतिप्रचंड गारांचा वर्षाव. ९२ ठार. गारांच्या वजनाचा हा विक्रम अजुन अबाधित आहे.
१९९५ : टेबल टेनिसमधे सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.
२००८ : भारतातील कोलकत्ता व बांगलादेशाची राजधानी ढाका या दोन देशादरम्यान रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.
२०१० : पश्चिम बंगाल, उडीसा, झारखंड आणि बिहार राज्यात आलेल्या चक्रवर्ती वादळामुळे सुमारे १२३ लोकांचे निधन झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२९ : क्रिस्टियन हायगेन्स डच गणितज्ञ, खगोलविद्? आणि पदार्थवैज्ञानिक, लंबकाच्या घड्याळाचा शोध (मृत्यू: ८ जुलै १६९५)
१६७५ : छत्रपती शिवाजी महाराज यांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम भोसले यांच्या दुसऱ्या पत्नी राणी ताराबाई भोसले यांचा जन्मदिन.
१८३३ : व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता रॉस लोव्हिस मंगल्स व्हीसी यांचा जन्मदिन.
१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणार्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ६ डिसेंबर १९५६)
१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार.
१८९८ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारमधील प्रसिद्धी व प्रचार प्रमुख सुब्बीर अप्पादुराई यांचा जन्मदिन.
१९०७ : भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभिक नेते व माजी सरचिटणीस पूरणचंद जोशी यांचा जन्मदिन.
१९१४ : शांता हुबळीकर अभिनेत्री (मृत्यू: १७ जुलै १९९२)
१९१९ : शमशाद बेगम पार्श्वगायिका (मृत्यू: २३ एप्रिल २०१३)
१९२२ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९८९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (मृत्यू: १८ जून २००९ सॅन अन्सेल्मो, कॅलिफोर्निया, यू. एस. ए.)
१९२७ : द. मा. मिरासदार विनोदी लेखक (मृत्यू: )
१९३३ : सर्जनशील कला अकादमीचे संस्थापक-प्राचार्य अनिल कुमार दत्ता यांचा जन्मदिन.
१९४२ : मार्गरिट अल्वा केंद्रीय मंत्री व राजस्थानच्या राज्यपाल
१९४३ : रामदास फुटाणे वात्रटिकाकार
१९५७ : भारतीय मल्याळम स्त्रीवादी लेखिका आणि नाटककार के. सरस्वती अम्मा यांचा जन्मदिन.
१९५७ : भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष तसचं, विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे माजी संचालक कैलासावादिव शिवन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५० : भारतीय तत्त्ववेत्ते योगी रमण महर्षी तथा वेंकटरमण अय्यर समाधिस्थ झाले. चैत्र व. १२ शके १७८३ (जन्म: ३० डिसेंबर १८७९)
१९६२ : सर मोक्षगुंडम्? विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता.
१९६२ : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंते, विद्वान, मुत्सद्दी आणि मैसूर संस्थानचे दिवाण
१९६३ : केदारनाथ पांडे तथा राहूल सांकृतायन इतिहासकार (जन्म: ९ एप्रिल १८९३)
१९९७ : चंदू पारखी चित्रपट आणि नाट्य अभिनेते (जन्म:)
१९९८ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, छायाचित्रकार व पटकथालेखक नितीन बोस यांचे निधन.
२०१३ : राम प्रसाद गोएंका उद्योगपती (जन्म: १ मार्च १९३०)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# बँक बंद असल्यामुळे मर्चंट बँकेबाहेर खातेदारांची गर्दी

## फक्त गोल्ड लोन सोडून देणं सुरू; बँक अध्यक्ष अग्रवाल यांचा फोन बंद

जालना। प्रतिनिधी

गेल्या दोन दिवसांपासून जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या विलीनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांनी आज गंभीर वळण घेतले. यामुळे आज खातेदारांनी पैसे काढून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती परंतु कोणालाही पैसे देण्यात आले नाही यामुळे खातेदार व डिपॉझिट ठेवणाऱ्याचे झोपा उडाल्या बँकेची खरी परिस्थिती जाणून घेण्यासाठी बँकेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांना संपर्क केला असता त्यांचा फोन बंद करून ठेवला होता. या बँकेची कोटी रुपयाची फसवणूक केल्यामुळे आता डिपॉझिट ठेवणाऱ्याचे पैसे मिळणार का नाही असा प्रश्न समोर आला आहे. बँकेचे फसवणूक केल्याप्रकरणी बँकेचे अध्यक्ष व संचालक मंडळ जबाबदार असल्याचे बोलल्या जात आहे तसेच हा बँकेची फसवणुकीचा प्रकार संगणमतानी झाल्या असल्याचे चर्चा सुरू आहे. तसेच जिल्हा उपनिबंधक यांचे नियंत्रण नसल्यामुळे आशा बँक फसवणुकीचे प्रकरण वाढत आहे याला जबाबदार जिल्हा उपनिबंधक व जालना तालुकाउप जबाबदार आहे.आपल्या आयुष्याची पुंजी सुरक्षित आहे




की नाही, या शंकेने ग्रासलेल्या शेकडो खातेदारांनी आणि सभासदांनी आज बँकेच्या मुख्य शाखेसह विविध शाखांवर एकच गर्दी केली. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची चिन्हे दिसताच पोलिसांना पाचारण करावे लागले.

सकाळपासूनच बँकेच्या प्रवेशद्वारावर खातेदारांची गर्दी होण्यास सुरुवात झाली होती. डीएनएस बँकेचे पत्र आणि त्यातील एनपीए संदर्भातील उल्लेख सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे लहान व्यापारी, पेन्शनधारक आणि सामान्य बचत खातेदारांमध्ये घबराट पसरली आहे. पैसे काढण्यासाठी चढाओढः अनेक खातेदार आपले पैसे काढून घेण्यासाठी किंवा मुदत ठेवी मोडण्यासाठी बँकेत आले होते. प्रशासनाची तारांबळः एकाच वेळी शेकडो लोक बँकेत शिरल्याने बँकेच्या कर्मचाऱ्यांची आणि सुरक्षा रक्षकांची मोठी ओढाताण झाली. गर्दी वाढल्याने आणि बँकेच्या आवारात गोंधळ निर्माण झाल्याने अखेर स्थानिक पोलिसांनी हस्तक्षेप केला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी गर्दी पांगवली. काही वेळ बँकेचे कामकाज थांबवावे लागले होते. पोलिसांनी खातेदारांना शांत राहण्याचे आवाहन केले, मात्र ‘‘आमच्या कष्टाच्या पैशाचे काय?‘‘ असा संतप्त सवाल ग्राहक विचारत होते. बँकेबाहेर उभ्या असलेल्या एका ज्येष्ठ नागरिक खातेदाराने आपली व्यथा मांडली, ‘‘आम्ही आयुष्यभर कमावलेला पैसा या बँकेत ठेवला आहे. आता विलीनीकरणाच्या आणि तोट्याच्या बातम्या येत आहेत. जर बँक बुडाली किंवा दुसऱ्या बँकेत गेली, तर आम्हाला आमचे पैसे कधी मिळतील? बँकेकडून कोणतेही स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने आम्हाला भीती वाटत आहे. अशीच भावना शहरातील लहान व्यापाऱ्यांचीही आहे. अनेकांनी आपला रोजचा व्यवहार या बँकेतून बंद करून पैसे इतरत्र हलवण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे, इतकी मोठी गर्दी आणि गोंधळ होऊनही अद्याप पोलीस ठाण्यात बँक प्रशासनाविरोधात कोणतीही अधिकृत लेखी तक्रार दाखल झालेली नाही.

# बचत गटातील महिलांनी उद्योगात भरारी घ्यावी- जिल्हाधिकारी मित्तल



## जिल्हाधिकारी कार्यालय व्यापारी महासंघ महिला आघाडीतर्फे मार्गदर्शन शिबिर

जालना। प्रतिनिधी

बचत गटातील महिलांनी उद्योगात भरारी घ्यावी उद्योग व्यवसायात स्वतःची प्रगती करावी आणि आपल्यातील सुप्त कलागुणांना वाव द्यावा. आजच्या संगणक युगात तंत्रज्ञानाची जोड देऊन बचत गटांनी आपला विस्तार वाढवावा, असे आवाहन जालन्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी केले. जालना जिल्हा शहरी व ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय आणि व्यापारी महासंघ महिला आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय मार्गदर्शन शिबिरात त्या बोलत होत्या.

येथील प्रसिद्ध मार्गदर्शक प्रतीक यांनी महिलांना व्यवसायातील बारकाव्यांवर सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने: व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय, मालाचे मार्केटिंग, खरेदी-विक्री आणि नफा-तोटा यांचे अचूक अंदाजपत्रक, खाद्यपदार्थ उत्पादनांसाठी आवश्यक असणारे ’फूड अँड ड्रग’ लायसन, उत्पादनावर एक्सपायरी डेट, बॅच नंबर टाकण्याचे महत्त्व, स्वच्छता आणि उत्पादनाची गुणवत्ता कशी टिकवावी, यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात संगणक प्रशिक्षण व्यवसायासाठी किती आवश्यक आहे, यावरही यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. व्यापारी महासंघ महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. आनंदी अय्यर यांनी या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातील महिलांचे प्रभावी संघटन केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेनंतर जिल्हाधिकारी मित्तल यांनी सांगितले की, बचत गटांच्या प्रगतीसाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी येणाऱ्या काळात अशाच प्रकारच्या उत्कृष्ट मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल. या माध्यमातून सरकारच्या महिला सक्षमीकरण या संकल्पनेच्या आपले प्राधान्य राहील, त्या म्हणाल्या.या शिबिराला जालना जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पाथर्डी आगारात नवीन १० बस गाड्या उपलब्ध होणार

## वि.प.सदस्य आ.शिवाजीराव गर्जे यांच्या प्रयत्नांना यश

पाथर्डी । प्रतिनिधी

प्रवाशांच्या वाढत्या संख्येपुढे नव्या गाड्यांची आगारामध्ये तातडीची गरज पाहता विधान परिषद सदस्य आमदार शिवाजीराव गर्जे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन पाथर्डी आगारासाठी नव्या गाड्यांची मागणी केली त्यानुसार पाथर्डी आगाराला १० नवीन बस गाड्या उपलब्ध करून देण्याचा आदेश परिवहन मंत्र्यांनी एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयास दिला या निर्णयाचे प्रवासी संघटनांकडून स्वागत करण्यात आले उन्हाळी सुट्ट्या धार्मिक पर्यटन धोंड्याचा महिना व लग्नसराईचा हंगाम यामुळे प्रवाशांची गर्दी वाढली आहे अहिल्यानगर पाथर्डी या मार्गावर जलद व तत्पर सेवा करण्यासाठी नव्या बस गाड्यांची टंचाई निर्माण झाल्याने उत्पन्नामध्ये घट व प्रवाशांचा संताप वाढू लागला होता सर्वाधिक गर्दी याच मार्गावर असते बस गाड्या अभावी येथील फेऱ्यांचे नियोजन विस्कळीत झाले होते.

आगार प्रमुख अमित बनसोडे यांनी प्रवासी संघटनेच्या शिफारशीनुसार आमदार शिवाजीराव गर्जे यांचेकडे वाढीव नवीन बस गाड्या मिळण्याबाबत पत्र दिले जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सर्वाधिक प्रवासी संख्या पाथर्डी तालुक्यात असून मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला कमी अंतराने जोडणारा सर्वाधिक वाहतुकीचा रस्ता पाथर्डी मार्गे बनला आहे बीड वरून पुण्या मुंबईकडे जाण्यासाठी अत्यंत सुस्थितीत नवगण राजुरी शिरूर कासार चिंचपूर मार्गे रस्ता कमी अंतराचा असल्याने जामखेड मार्गे जाणारी खाजगी वाहतूक सुद्धा पाथर्डी मार्गे सुरू झाली आहे पंढरपूर सोलापूर संभाजीनगर वैजापूर चाकण मार्गे मुंबई अक्कलकोट शेगाव नांदेड तिसगाव मार्गे नाशिक या मार्गावर फेऱ्या सुरू करण्यासाठी गाड्यांची आवश्यकता होती राज्य परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयासह कार्यकारी संचालकांना परिवहन मंत्री यांनी याबाबत तातडीने गाड्या देण्यासाठी आदेशित केले आहे याबाबतचे पत्र प्राप्त होतात पाथर्डी आगारामध्ये सर्व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले मागील वर्षी आमदार मोनिका राजळे यांच्या प्रयत्नातून दहा नवीन बस गाड्या मिळाल्या होत्या पाथर्डी आगारातील एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी पाथर्डीच्या जुन्या बस स्थानकासाठी विशेष निधी देऊन अद्ययावत बस स्थानकासह व्यापारी संकुल उभारण्याबाबत आमदार शिवाजीराव गर्जे यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पाठपुरावा करावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली असून, अपघात प्रवण क्षेत्र (ब्लॅक स्पॉट्स) निश्चित करून त्यावर तातडीने योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया यांनी दिल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत




हदगल, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बालाजी धनवे, वाहन निरीक्षक दीपक जाधव तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अभियंता उपस्थित होते.

वाहतुकीच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या उघड्या विहिरींमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने संपूर्ण जिल्ह्याचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. या सर्वेक्षणात आढळलेल्या धोकादायक विहिरींवर आता जीव संरक्षक यंत्रणा कार्यान्वित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात येत आहे.रस्ते सुरक्षेचा आढावा केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी, यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता दर महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी रस्ते सुरक्षा समितीची नियमित बैठक घेतली जाणार आहे. या बैठकीत मागील कामाचा आढावा आणि नवीन उपाययोजनांवर चर्चा केली जाईल. बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महापालिका प्रशासनाला रस्त्यांवरील खड्डे बुजवणे, आवश्यक तिथे गतिरोधक बसवणे आणि दिशादर्शक फलक लावण्याचे कडक निर्देश दिले आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस आणि उप प्रादेशिक परिवहन विभागाने संयुक्तपणे मोहीम राबवून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच सर्व शासकीय अधिकाऱ्यांनी दुचाकी चालविताना स्व प्रेरणेने हेल्मेट परिधान करावे, अशी सूचनाही यावेळी करण्यात आली.

# टाकळी फाटा ते निपाणी जळगाव रस्त्याची दुरावस्था

पाथर्डी । प्रतिनिधी

टाकळी फाटा ते निपाणी जळगाव जवळपास पाच किलोमीटर अंतर असलेल्या रस्त्याची दुरावस्था झाली असून रस्ता पूर्णपणे उखडला गेला आहे रस्त्यावरून वाहन चालवणे अत्यंत जिकरीचे काम झाले आहे टाकळी फाट्यावरून निपाणी जळगाव पागोरी पिंपळगाव दुले चांदगाव अमरापूर इत्यादी गावांना जोडणारा उपमर्ग आहे टाकळी फाट्यालगत निपाणी जळगाव गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी असल्याने टाकळी फाटा ते निपाणी जळगाव सायंकाळी रोज शेतकरी बैलगाडी दोन चाकी व चार चाकी गाडीने दैनिक दळणवळणासाठी प्रवास



करत असतात यामुळे टाकळी फाटा ते निपाणी जळगाव हा रस्ता पाथर्डी तालुक्याला व बीड सरहद्दीला जोडणारा असल्याने हा रस्ता तातडीने नवीन डांबरीकरण करून तयार करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. भगवानगडाचा ९३ वा फिरता नारळी सप्ताह पुढील वर्षी निपाणी जळगाव या गावात होणार असल्याने महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून भगवानगडाचे भक्तगण या सप्ताह सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत या अनुषंगाने लोकप्रतिनिधी आमदार मोनिका राजळे यांनी विशेष लक्ष घालून पुढील वर्षी संतश्रेष्ठ भगवानबाबांच्या नारळी सप्ताहपूर्वी टाकळी फाटा ते निपाणी जळगाव या रस्त्यासाठी विशेष निधीची तरतूद करून रस्त्याचे काम पूर्ण करावे अशी अपेक्षा आहे.

# यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती डीजेमुक्त साजरी होणार

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी पुढाकार घेत सर्व लोकप्रतिनिधीसोबत समन्वय ठेवून गणेशोत्सव आणि शिवजयंती डीजेमुक्त साजरी करण्याचा यशस्वी प्रयोग राबविला. त्याच धर्तीवर आगामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीही डीजे आणि लेझरमुक्त साजरी करून शहराने नवा आदर्श प्रस्थापित करावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे. मिरवणुकीत नियमांचे उल्लंघन करून डीजे किंवा लेझरचा वापर केल्यास थेट साहित्य जप्त करून गुन्हे दाखल केले जातील, असा कडक इशारा परिमंडळ-१ चे पोलिस उपायुक्त पंकज अतुरकर यांनी दिला.

क्रांती चौक हद्दीतील गांधी भवन येथे आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष दिनकर ओंकार यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत जयंती उत्सव आनंदात, उत्साहात परंतु शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस अरुण बोर्डे, विजय वाहुळ, साहेबराव नवतुरे, अभय टाकसाळ, विनोद बनकर यांच्यासह समितीचे ३० ते ३५ पदाधिकारी उपस्थित होते. मिरवणूक मार्गावर महावितरणने योग्य प्रकाशव्यवस्था करावी, लोंबकळणाऱ्या तारा सुरक्षित कराव्यात, तसेच महापालिकेने फिरते शौचालय, पिण्याचे पाणी आणि गल्लीबोळांत बॅरिकेडिंग करावे, अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली. यावर बोलताना उपायुक्त अतुरकर म्हणाले की, या सुविधांसाठी संबंधित विभागांशी पत्रव्यवहार झाला असून, लवकरच संयुक्त बैठक घेऊन सर्व त्रुटी दूर केल्या जातील, असे बैठकीत आश्वासित करण्यात आले. मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी यंदा एक मंडळ, एक अंमलदार या सूत्राची अंमलबजावणी केली जाणार आहे. पोलिस महासंचालक कार्यालयाचा हा निर्णय असून, मिरवणूक सुरू झाल्यापासून ती संपेपर्यंत संबंधित पोलिस ठाण्याचा एक अंमलदार प्रत्येक मंडळासोबत कायमस्वरूपी तैनात असेल.

## जाहीरनामा

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.
जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३
मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मौने खडकत ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार, नामे, कल्याण बाबागीर गोसावी रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे स्वतःचे नामे, कल्याण बाबागीर गोसावी रा. खडकत ता. आष्टी जि.बीड याची जन्म दि. १८/०६/१९४४ रोजी मौजे. खडकत ता. आष्टी जि. बीड येथे झाला असून अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची स्वतः यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१०/०४/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार, आष्टी**

# अयोध्येतील मंदिराच्या धर्तीवर तुळजाभवानी मंदिराचे रुप बदलणार

धाराशिव / प्रतिनिधी

तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिराच्या विकासकामांचे भूमिपूजन मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्रालयात या संदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार राणाजगजीतसिंह पाटील, छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर, अपर पोलिस अधीक्षक शफकत आमना तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री सरनाईक म्हणाले की, राज्य शासनाने सुमारे १८६५ कोटी रुपयांच्या श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे. त्यापैकी ४२१ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांसाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विकास कामांमुळे बाधित होणाऱ्या १०५ खाजगी मालमत्तांपैकी सुमारे ७५ टक्के मालमत्ता धारकांशी शासनाने यशस्वी वाटाघाटी केल्या आहेत.त्यामुळे उर्वरित विकास कामांची निविदा प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर,तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यांतर्गत विविध कामांचे भूमिपूजन मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अयोध्येतील राम मंदिराच्या धर्तीवर तुळजाभवानी मंदिर परिसराचा विकास भव्य व दिव्य स्वरूपात व्हावा, यासाठी वेळेचे काटेकोर पालन करून नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. बैठकीत रामदरा तलावाजवळ विकसित होणाऱ्या शिवसृष्टी उद्यानाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मंदिर परिसरातील आठ जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार आणि आठ कुंडांचे पुनरुज्जीवन करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. याशिवाय पार्किंग प्लाझा, प्रमुख रस्त्यांचे सुशोभीकरण,भक्तनिवास आणि दर्शन मंडप यांसारख्या कामांबाबतही आवश्यक सूचना देण्यात आल्या. तुळजापूर शहराचा वेगाने विस्तार होत असल्याने शहरासाठी स्वतंत्र ‘मास्टर प्लॅन’ तयार करून सुनियोजित विकास साधण्याच्या सूचनाही मंत्री सरनाईक यांनी दिल्या.या कामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही,असे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर,अशा प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने समिती स्थापन करावी आणि इच्छुकांना शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार पुतळे उभारण्यासाठी मार्गदर्शन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.यामुळे सामाजिक सलोखा अबाधित राहील आणि महापुरुषांचा सन्मानही राखला जाईल,असे त्यांनी सांगितले. बैठकीत श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यासोबतच मुख्यमंत्री शेतकरी सौर पंप योजना, जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, जलसंपदा,मृद व जलसंधारण विभाग,नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजना तसेच जलजीवन मिशनअंतर्गत पाणीटंचाई या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत संबंधित विभागांनी आपल्या कामकाजाचा अद्ययावत आढावा सादर केला.तसेच बैठकीनंतर तत्काळ कार्यवाही अहवाल सादर करण्याचे आदेशही मंत्री सरनाईक यांनी दिले.

# नगरसेवक असल्याची बतावणी करून मनपा डॉक्टरांना दमदाटी

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

महापालिकेच्या एन-८ हॉस्पिटल व मेल्ट्रॉन हॉस्पिटल येथे स्वतःला नगरसेवक म्हणून भासवून स्टाफला दमदाटी करणाऱ्या दोन इसमांविरुद्ध सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

इमरान सालार (रा. बुडीलेन) व असरार अहमद (रा. रहमानिया कॉलनी) अशी संबंधित इसमांची नावे आहेत. संबंधित दोघांनी आज सकाळी सुमारे ११ ते दुपारी २.१५ वाजेपर्यंत एन-८ हॉस्पिटल येथे बाह्यरुग्ण विभागाच्या वेळेत उपस्थित राहून स्वतःला नगरसेवक असल्याचे सांगत डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडे विविध कागदपत्रांची मागणी केली तसेच कामकाजाबाबत चौकशी केली. या दरम्यान, हॉस्पिटल प्रशासनाने त्यांच्या वर्तनाची नोंद घेण्यासाठी फोटो व व्हिडिओ घेण्याचा प्रयत्न केला असता, संबंधित इसमांनी त्यास विरोध करून चित्रिकरणास मज्जाव केला. यानंतर दोघांनी दुपारी ३ ते सायंकाळी सुमारे ६.४५ वाजेपर्यंत मेल्ट्रॉन हॉस्पिटल येथे थांबून डॉक्टर व स्टाफकडे स्टॉक रजिस्टर दाखविण्याची मागणी केली. स्टॉक रजिस्टर ताब्यात घेतल्यानंतर त्यातील संपूर्ण नोंदींची झेरॉक्स प्रत बाहेरून काढण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे.

# योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या शाळेतून ख्रिश्चन धर्माचा प्रसार?

## कर्मचाऱ्यांच्या मदतीने पंधरा वर्षापासून चालू होता हा उद्योग; धर्म प्रसार करणारा शाळेचा कर्मचारीच नाही

### शाळेतील कपाटात सापडली पुस्तके, जादूटोण्याची आणि नशेची औषधे?

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संपूर्ण मराठवाड्यामध्ये प्रसिद्ध असलेल्या अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय परिसरात असलेल्या शाळेमध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार होत असल्याची माहिती मिळाल्यावर सकल हिंदू संघटनेच्या वतीने या ठिकाणी जाऊन चौकशी केली असता या शाळेमध्ये कपाटामध्ये ख्रिश्चन धर्माची प्रसार करणारी पुस्तके काही औषधे या ठिकाणी आढळून आली गेल्या पंधरा वर्षापासून या ठिकाणी शाळेत कर्मचारी नसलेला एक व्यक्ती येऊन धर्मप्रसार करीत असल्याची माहिती कार्यकर्त्यांना मिळाली असून हा व्यक्ती कर्मचाऱ्यांच्या मदतीने या ठिकाणी धर्म प्रसार करत असल्याचे स्पष्ट झाले आहे याप्रकरणी संघटनेच्या वतीने पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. भाजपाचे




जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी या ठिकाणी जाऊन या प्रकाराची माहिती घेतली. याबाबत आपण ग्राहमंत्र्यांना कळवणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

अंबाजोगाई येथील नामांकित योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या शाळेमध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार होत असल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे जिल्हाभरात एकच खळबळ उडाली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय परिसरात असलेल्या संस्थेच्या एका शाळेतून ख्रिश्चन धर्माचा प्रसार केला जात असल्याची ◀◀ पान ३ वर

### दोशींवर तात्काळ कारवाई करू

कुठलीही शिक्षण संस्था,शाळा महाविद्यालय कुठलीही जागा धर्मप्रसाराचे कार्य करण्याची जागा नाही. हा योगेश्वरीचा स्थापनेपासून चा विचार आहे तो आम्ही आजही जपत आहोत.आम्ही या प्रकरणात ताबडतोब चौकशी करुन दोशींवर तात्काळ कारवाई करणार असल्याचे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी सांगितले .

### हा प्रकार संस्थाचालकाच्या कसा लक्षात आला नाही

जर हा व्यक्ती गेल्या पंधरा वर्षापासून शाळेशी संबंध नसतांनाही या ठिकाणी येऊन स्वतःचे कपाट ठेवतो. त्या ठिकाणी वस्तू ठेवतो आणि तरीही संस्था चालकाला याबाबत माहीत होत नाही. पंधरा वर्षापासून तो या ठिकाणी धर्मप्रसाराचे काम करतो. ही बाब संस्था चालकाच्या लक्षात कशी काय लक्षात आली नाही ? याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### तर आत्मदहन करू

या शाळेत जाऊन आम्ही व्यवस्थित चौकशी केली असता शाळाबाह्य असलेला माणूस या ठिकाणी धर्मप्रसार करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी कारवाई झाली नाही तर आम्ही शाळेसमोर आंदोलन करून तरीही कारवाई झाली नाही तर प्रसंगी आत्मदहन करू असा इशारा सकल हिंदू समाज संघटनेचे कार्यकर्ते जयदीप चिलमे यांनी दिला.

### गृहमंत्र्यांकडे तक्रार करणार

यासंदर्भात बोलतांना भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले की, मी अंबाजोगाई मध्येच आहे. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.या संदर्भात संपूर्ण माहिती घेऊनच मी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे यावेळी देशमुख म्हणाले.



## महात्मा फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली – राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

लोकविकास महाआघाडीच्या वतीने थोर समाजसुधारक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी अभिवादन करण्यात आले.

राजकिशोर मोदी म्हणाले की,महात्मा फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली तसेच शोषित, दीन दलितांच्या उद्धारासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले.

पृथ्वीराज साठे म्हणाले की,महात्मा फुलेंनी तत्कालीन रूढी-परंपरांना छेद देत सामान्य माणसाला स्वाभिमानाने जगण्याची नवी वाट दाखवली.यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत ◀◀ पान ३ वर

## धाबा चालकाकडून गावठी पिस्टल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैध शस्त्रसाठा बाळगणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने (ङउइ) धडक कारवाई सुरू केली असून, बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोमनवाडी शिवारात एका धाबा चालकाला गावठी पिस्टलसह जेरबंद करण्यात आले आहे.



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली होती की, मौजे सोमनवाडी शिवारातील धाबा चालक विलास अंकुश चाटे हा स्वतःकडे पिस्टल बाळगून असून तो सध्या धाब्यावरच आहे. या माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने शुक्रवारी, १० एप्रिल २०२६ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास सदर धाब्यावर छापा टाकला.

मुद्देमाल आणि गुन्हा दाखल

या कारवाईत पोलिसांनी विलास चाटे यास ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून ४०,००० रुपये किमतीचे एक गावठी बनावटीचे पिस्टल जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलीस नाईक गोविंद भताने यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९७/२०२६, कलम ३/२५ आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी आणि जप्त केलेले पिस्टल पुढील तपासासाठी बर्दापूर पोलिसांच्या स्वाधीन ◀◀ पान ३ वर



**बीड – महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक जयंती उत्सवा निमित्त सकाळी ९ वाजता समता ज्योत काढण्यात आली होती. या ज्योतीचा समारोप करून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत, गणेश जगताप, ॲड. संदीप बेदरे, प्रा. लक्ष्मण गुंजाळ, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, बीड शहराध्यक्ष नितीन राऊत, सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्निल शिंदे, धनंजय काळे, अमर ढोणे, सोन्नर यांच्यासह समता सैनिक व महिला दिसत आहेत.**



**माजलगाव:– लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि,सुंदरनगर तेलगाव... कार्यालयात दि ११ एप्रिल शनिवार रोजी स्त्री शिक्षण आणि समतेची मशाल पेटवनारे क्रांती सूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी करनेत आली. प्रतिमेस पुष्पाजंली अर्पण करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, विष्णु मोरे, रामदास आगे, बालाजी सुरवसे, विठ्ठल पौळ, ज्ञानेश्वर ठोंबरे, नानाभाऊ वाघचौरे, दिगंबर विर**

## मराठा सेवा संघातर्फे प्राजक्तताई धस यांना स्त्री शक्ती प्रेरणा पुरस्कार जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय पातळीवर समता, समानता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय या मूल्यांचा पुरस्कार करून समाजामध्ये काम करीत असलेल्या मराठा सेवा संघातर्फे राज्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष इंजि. विजय घोगरे यांच्यातर्फे इंजि. तानाजी बापू जंजिरे यांनी आष्टी येथील पत्रकार परिषदेमध्ये हे पुरस्कार जाहीर केले.



अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शिवमती शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या राजकीय सामाजिक सांस्कृतिक व महिला सक्षमीकरण कार्यामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना समाजभूषण पुरस्कार देण्यात येत आहे तर महानंद डेअरीच्या संचालिका आष्टी येथील शिवमती प्राजक्ताताई सुरेश धस यांनी वेगवेगळ्या माध्यमातून स्त्री सुधारण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांना स्त्री शक्ती प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आला आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन ८७ वर्षे वयाचे आष्टीचे सुपुत्र सावळेराम कृष्णाजी जंजिरे काका ,यांनी मुंबई येथे राहून गावाकडील विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीबद्दल व दीपस्तंभ ◀◀ पान ३ वर

## अंबाजोगाईत बारावीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील सावता माळी चौक परिसरात राहणाऱ्या १७ वर्षीय पूनम मेघराज दहिफळे या बारावीच्या विद्यार्थिनीने अभ्यासाच्या तणावातून गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली.मूळची धारुर तालुक्यातील उमरेवाडी येथील असलेली पूनम शिक्षणासाठी अंबाजोगाईत वास्तव्यास होती. शुक्रवारी १० एप्रिल रोजी रात्री तिने राहत्या घरी सीलिंग फॅनला गळफास घेतला, ज्याची माहिती शनिवारी सकाळी समोर आली.या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.पूनम तिचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी लहान भाऊ आणि आजीसोबत अंबाजोगाईत राहत होती, तर तिचे वडील नोकरीनिमित्त पुण्यात असतात. प्राथमिक माहितीनुसार, परीक्षेच्या आणि अभ्यासाच्या दडपणामुळे तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे. अंबाजोगाई शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पाठवला असून या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ येथे भव्य मंदिर उभारणीसाठी देणग्यांचा ओघ सुरूच; भक्तांना सहकार्याचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने मच्छिंद्रनाथ येथे सुरू असलेल्या भव्य व दिव्य मंदिर उभारणीच्या कामांना सध्या चांगलाच वेग आला असून परिसरातील विविध विकासकामेही टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जात आहेत. या पवित्र कार्यासाठी राज्यभरातील भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून सढळ हस्ते देणग्यांचा ओघ सुरू आहे.



शनिवारी गडाचे विश्वस्त आ. सुरेश धस यांच्या उपस्थितीत विविध नाथभक्तांकडून देणग्या स्विकारण्यात आल्या. यावेळी हुले कन्स्ट्रक्शनचे विश्वनाथ हुले यांनी १ लाख ७ हजार रुपये, कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथील नाथभक्त राजेंद्र चौगुले यांनी २१ हजार रुपये, तसेच आष्टी येथील महेश चौरे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त ११ हजार रुपये देणगी स्वरूपात अर्पण केले.

मंदिर उभारणी व परिसर विकासाची ही सेवा अत्यंत पवित्र आणि समाजोपयोगी असल्याचे नमूद करत, सर्व नाथभक्तांनी या कार्यात सहभागी होऊन आपल्या परीने सढळ हस्ते देणगी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. कोल्हापूर येथील सोने-चांदीचे व्यापारी व नाथभक्त राजेंद्र चौगुले यांनी एक आदर्श घालून दिला आहे. सन १९९९ मध्ये आ. सुरेश धस हे आमदार व्हावेत यासाठी व्यापाऱ्यांमध्ये लावलेल्या पैजेतील जिंकलेली ८ हजार रुपयांची रक्कम त्यांनी जपून ठेवली होती. आता मुलाच्या लग्नाचे औचित्य साधून अनावश्यक खर्च टाळत त्या रकमेत वाढ करून एकूण २१ हजार रुपये श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थानाच्या मंदिर जिर्णोद्धारासाठी देणगी म्हणून अर्पण केली.




## प्रदीप माने यांची शिवसेना बीड विधानसभा संघटकपदी नियुक्ती!

बीड । प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा क्षेत्रासाठी प्रदीप माने यांची संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, मराठवाडा संपर्कप्रमुख तथा राज्याचे आरोग्यमंत्री ना. प्रकाशजी आबिटकरसाहेब, विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब आणि बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या आदेशानुसार करण्यात आली. दि. ९ एप्रिल २०२६ रोजी प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते प्रदीप माने यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, बीडमध्ये शिवसेना संघटना अधिक मजबूत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली.

## सुनेत्राताईंना शिवसंग्रामचा पाठिंबा- डॉ ज्योतीताई मेटे

### मेटे साहेबांचे अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे स्वप्न पूर्ण व्हावे ही अपेक्षा

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाची पोट निवडणूक होत असून या निवडणुकीमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार उभ्या असून शिवसंग्राम या संघटनेचा सुनेत्राताई पवार यांना आज पत्रकार परिषदेमध्ये शिवसंग्रामच्या नेत्या डॉक्टर ज्योतीताई मेटे यांनी पाठिंबा जाहीर केला.



पुणे येथील पत्रकार भवन या ठिकाणी शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनी पत्रकार परिषद घेत बारामती पोटनिवडणूक मध्ये महायुतीच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना पाठिंबा देत असून ज्याप्रमाणे स्व विनायकराव मेटे स्व गोपीनाथराव मुंडे स्व अजित पवार स्व विलासराव देशमुख स्व आर आर पाटील आणि शरद पवार यांनी जसा सलोखा जपला त्याचप्रमाणे आम्हीही शिवसंग्राम पक्षाच्या वतीने प्रेम सलोखा राखून र उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना पाठिंबा देत आहोत अशी भूमिका शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनी घेतल शिवसंग्रामचे नेते स्व विनायकराव मेटे यांनी अरबी समुद्रामध्ये शिवस्मारक व्हावं इथे आपल्या डोळ्यासमोर व्हावं अशी आग्रही भूमिका घेतली होती त्यांना शिवस्मारकाच्या समितीमध्ये अध्यक्ष पद दिले होते मात्र त्यांच्या निधनानंतर शिवस्मारकाचा प्रश्न मागे राहिला आता महायुतीचे सरकार हे स्वप्न पूर्ण करेल असा विश्वास डॉक्टर ज्योती मेटे यांनी व्यक्त केला पाठिंबा देण्यामागे कोणतीही भूमिका नसल्याचे स्पष्ट करताना महाराष्ट्राची परंपरा आपण जपत आहोत असा उल्लेख त्यांनी आवर्जून केला या पत्रकार परिषदेला शिवसंग्रामचे राज्य पदाधिकारी उपस्थित होते

## जिल्ह्यात २ हजार ३६० गोरगरीब विद्यार्थ्यांना मिळणार इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश

बीड । प्रतिनिधी

शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी काढण्यात आलेल्या सोडतीतून जिल्ह्यात एकूण २ हजार ३६० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना ११ ते २० एप्रिल या कालावधीत प्रवेश निश्चित करता येणार असल्याची माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली.

आरटीई अंतर्गत जिल्ह्यातील २१४ शाळांमध्ये २ हजार ४२५ जागा उपलब्ध आहेत. या जागांसाठी ६ हजार ३१६ अर्ज दाखल झाले होते. जागांच्या तुलनेत अर्जांची संख्या जास्त असल्याने ६ एप्रिल रोजी सोडत काढण्यात आली. त्यातून २ हजार ३६० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून १ हजार ९१२ विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात आली आहे.

प्रवेशासाठी निवडयादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात आली असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २० एप्रिलपर्यंत प्रवेश घेण्याची मुदत देण्यात आली आहे. नियमित प्रवेश पूर्ण झाल्यानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाणार आहे. यासाठी विविध प्रवेश फेऱ्या राबवून जूनपर्यंत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

या प्रवेश प्रक्रियेत गोरगरीब, वंचित आणि खऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांच्या हक्कांवर गदा येत असून काही अपात्र पालक खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रवेश मिळवत असल्याचे निदर्शनास येत आहे. यात भाडेकरार, आधारकार्ड व इतर कागदपत्रांचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत आहे.

शिक्षण हक्क कायदा अत्यंत कडक असून त्यानुसार कारवाई होणे आवश्यक आहे. नागपूर जिल्ह्यात ज्या प्रकारे खोट्या कागदपत्रांद्वारे प्रवेश घेणाऱ्या पालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले, त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातही अशा प्रकारच्या पालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

१) सोडतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर प्रवेशाबाबत एसएमएस पाठविण्यात येणार आहेत. मात्र, पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता स्वतः माहिती पडताळून घ्यावी.

२) निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा प्रशासन अधिकाऱ्यांकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी. पडताळणी समितीकडून कागदपत्रे प्रमाणित झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी ऑनलाइन परवानगी देण्यात येईल.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

रविवार दि.१२ एप्रिल २०२६ । पान ७

# पुण्यात पाणीकपातीची शक्यता! कमी पावसाच्या अंदाजामुळे प्रशासन सतर्क

पुणे । प्रतिनिधी

देशासह राज्यात यावर्षी पावसाळ्याच्या दिवसात सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामानशास्त्र विभाग तसेच 'स्कायमेट' या संस्थेनेही वर्तविला आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील धरणांमध्ये ३१ ऑगस्टपर्यंत पाणीसाठा टिकेल, त्यादृष्टीने नियोजन करण्यास सुरुवात झाली आहे.

त्यानुसार पुणे महापालिकेलाही पाणीकपातीबाबत नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. पाणीवापराबाबतच्या नियोजनात महापालिकेने सहकार्य न केल्यास त्याचा भुर्दंड महापालिका आणि पुणेकरांना बसणार आहे. त्यामुळे पाणीकपात करावी की नाही, हे महापालिकेनेच ठरवावे, असे सांगून पाणीकपातीच्या निर्णयाचा चेंडू जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महापालिकेच्या कोर्टात टोलविला आहे.

जलसंपदा विभागाने दोन दिवसांपूर्वी महापालिकेला सध्याचा पाणीसाठा आणि पुढील पावसाळ्यातील पावसाचा अंदाज



घेऊन धरणांतील पाणी लक्षात घेता पाणी उचलताना १५ टक्के पाणीकपात करावी, असे निर्देश दिले होते. त्यावर महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी मात्र ही शक्यता फेटाळली होती. पुणेकरांच्या हक्काचा एक थेंबही कपात केला जाणार नाही, असे सांगितले होते. त्याबाबत विखे पाटील यांनी शुक्रवारी (दि. १०) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत याबाबत आढावा घेतला.

पाणीकपातीबाबत विखे यांनी पत्रकारांशी बोलताना महापालिकेच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, पाणीकपातीचा मुद्दा हा जलसंपदा किंवा महापालिकेचा नाही. यावर्षी पाऊसमान कमी असल्याचे हवामानशास्त्र विभाग तसेच 'स्कायमेट' या दोन संस्थांनी स्पष्ट केले आहे. यंदाच्या अल निनो या घटकाच्या प्रभावामुळे सरासरीच्या तुलनेत पाऊस कमी असेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाची स्थिती गंभीर असल्यास सर्व धरणांमध्ये पाणीसाठा किमान ३१ ऑगस्टपर्यंत पुरेल, असे नियोजन करण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात येणार असून, त्यानुसार महापालिकेला निर्देश देण्यात आले आहेत.

पाणीकपातीपेक्षा वाढते शहरीकरण आणि पाण्याची वाढती मागणी, यानुसार पाणी पुरवावे लागणार आहे. जलसंपदा विभागाने केलेल्या नियोजनानुसार महापालिकेने सहकार्य न केल्यास त्याचा भुर्दंड महापालिकेला पर्यायाने पुणेकरांना बसणार आहे. त्यामुळे पाणीकपातीचा निर्णय महापालिकेने करायचा आहे, असेही ते म्हणाले. येत्या ३१ ऑगस्टपर्यंत किती पाणी उपलब्ध राहील, याची माहिती महापालिकेला देण्यात येणार आहे. ही उपलब्धता लक्षात घेऊन नियोजन करावे लागणार आहे, मात्र, जलसंपदा विभागाने महापालिकेला पाणीकपात करण्यास सांगणे आणि महापालिकेने त्याला विरोध करणे, यातून गैरसमज निर्माण होत आहेत, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

## पोलीस आयुक्तांचा दणका! ६ पोलिसांवर बडतर्फीची कुऱ्हाड; अटकेच्या भीतीने ३ पोलीस फरार

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणाऱ्या दोन वेगवेगळ्या खंडणी प्रकरणांमध्ये सहा पोलीस कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करणार असल्याची घोषणा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केली आहे. प्राचार्यांना पोक्सोच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवून लाखो रुपयांची खंडणी उकळणे आणि आयटी अभियंता तरुण–तरुणींना धमकावून पैसे उकळणे, असे गंभीर प्रकार समोर आल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

खंडणीचा गुन्हा दाखल होताच अजित बडे, महिला पोलीस आणि सुदाम तायडे हे तिघेही फरार झाले असून, त्यांच्या शोधासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. मंगळवार पेठेतील एका नामांकित कॉलेजच्या प्राचार्यांना बाललैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत सात लाख रुपयांची खंडणी





उकळल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक अजित बडे,

पुणे पोलीस खंडणी प्रकरण.

रीलस्टार महिला पोलीस आणि पोलीस कर्मचारी सुदाम तायडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी तत्काळ कारवाई करत तिघांना निलंबित केले असून, त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

याचबरोबर वाघोली पोलीस ठाण्यातील हवालदार किरण अब्दागिरे, पोलीस शिपाई गणेश खाडे आणि किरण कांबळे यांनी आयटी अभियंता तरुण–तरुणींना सेक्स रॅकेटमध्ये अडकवण्याची धमकी देत दहा हजार रुपये उकळल्याचा प्रकारही उघडकीस आला आहे. या प्रकरणात तरुणाला मारहाण केल्याचाही आरोप असून, तिघांनाही पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांनी निलंबित केले आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, की पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणाऱ्यांची कोणत्याही परिस्थितीत गय केली जाणार नाही. कोणत्याही चुकीला माफी मिळणार नाही. या सहा जणांना सेवेतून काढून टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

## उच्च न्यायालयाचा पोलिसांना झटका! पहिल्याच सुनावणीत तडीपारीचा आदेश रद्द

पुणे । प्रतिनिधी

ज्या गुन्ह्यांच्या आधारे तडीपारीचा आदेश काढला, ते गुन्हे गंभीर स्वरूपाचे नाहीत. त्यामध्ये सरकारी फसवणूक, शारीरिक इजा, संपत्ती लुटणे अथवा खंडणी उकळण्यासारख्या गंभीर गुन्ह्याचा समावेश नसल्याचा निष्कर्ष काढत तडीपाराचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन.जे. जमादार यांनी रद्द केला. हा निर्णय पोलिसांच्या दृष्टीने झटका मानला जात आहे.

यामुळे पोलीस उपायुक्तांचा तडीपारीचा आणि त्यानंतर हा आदेश कायम ठेवलेल्या विभागीय आयुक्तांचे आदेश रद्द



झाले आहेत. विशाल उर्फ साकी संजय गायकवाड असे आरोपीचे नाव आहे. त्याने ड.शैलेश खरात आणि ड.अब्दुलकय्युम सय्यद यांच्यामार्फत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. पिंपरी चिंचवड, परिमंडळ दोनच्या उपायुक्तांनी २७ ऑक्टोबर २०२५ रोजी गायकवाड विरोधात पुणे जिल्ह्यातून दोन वर्षे तडीपारीचा आदेश काढला होता.

याविरोधात त्याने ड.अभय शिरसाट आणि ड.अब्दुलकय्युम सय्यद यांच्यामार्फत कौन्सिल हॉल येथील विभागीय आयुक्त येथे अपील केले होते. १३ फेब्रुवारी रोजी हे अपील फेटाळल्यानंतर त्याने उच्च न्यायालयात अपील केले. आरोपीविरोधात ५ गुन्हे दाखल झालेले आहेत. तडीपार करताना पोलिसांनी गाईडलाईनचे पालन केले नसल्याचे उच्च न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. तसेच जेव्हा एखाद्या इसमाला दोन वर्षाच्या कालावधीसाठी हद्दपारी आवश्यक असल्याबाबत संबंधित प्राधिकाऱ्याने स्वतःची समाधानकारक कारणे नोंदवलेली नसतात, तेव्हा ते भारताच्या संविधानाच्या कलम १९(१)(ड ) अंतर्गत हमी दिलेल्या मूलभूत अधिकारांवर अवाजवी निर्बंध लादल्यासारखे ठरते, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

## भीमाशंकर मंदिर बंद कालावधी वाढला; भाविकांची नाराजी

मंचर: श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर येथील सुरू असलेल्या विकासकामांमुळे मंदिर बंद ठेवण्याचा कालावधी वाढविण्यात आल्याने भाविकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. आधी ३ महिन्यांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता कामे अपूर्ण असल्यामुळे पावणेदोन महिने मुदतवाढ देत ३१ मेपर्यंत मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी किमान मुखदर्शन सुरू करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथे होणारी गर्दी, भाविकांची सुरक्षितता तसेच जून महिन्यातील संभाव्य पावसाचे प्रमाण लक्षात घेऊन ९ जानेवारी ते ९ एप्रिल या कालावधीत मंदिर



बंद ठेवण्यात आले होते. मात्र, विकासकामे अद्याप पूर्ण न झाल्याने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मंदिर ३१ मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सूर्यकांत कुंभार यांनी दिलेल्या माहितीनुसार, सभामंडपाचे सुमारे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून, घुमटाचे काम सुरू आहे. तसेच मंदिराकडे जाणाऱ्या पायरीमार्गाचे कामही प्रगतीपथावर असल्याने सध्या भाविकांसाठी प्रवेशमार्ग बंद ठेविण्यात आला आहे.जूनच्या पहिल्या आठवड्यात पावसाळा सुरू होण्याची शक्यता असल्याने त्यापूर्वी ही कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, मंदिर बंद राहण्याच्या निर्णयामुळे स्थानिक हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. देशभरातील भाविकांनी आधीच बुकिंग केले होते; मात्र कालावधी वाढल्याने आरक्षणे रद्द करावी लागली.

मंदिरातील सभामंडप व दर्शन रांगेचे काम पूर्ण होईपर्यंत किमान मुखदर्शनाची सुविधा सुरू करावी, अशी मागणी कायदेशीर सल्लागार सूर्यकांत बाबा धायबर, भीमाशंकर हॉटेल अँड रिसॉर्ट असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण बांगर, उपाध्यक्ष अशोक लोहकरे, सचिव बाबाजी निघोट, सदस्य संतोष बोऱ्हाडे, कमलेश वळसे पाटील यांच्यासह हॉटेल व्यावसायिकांनी केली आहे.

## भिगवणमध्ये भटक्या कुत्र्यांचा हल्ला; १२ वर्षीय मुलगी जखमी

भिगवण: इंदापूर तालुक्यातील भिगवणमध्ये भटक्या कुत्र्यांच्या हैदोस सुरूच आहे. शुक्रवारी (दि. ९) प्रभाग १ मध्ये एका बारा वर्षीय मुलीवर चार ते पाच भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला. एका कुत्र्याने तिचा चावा देखील घेतला. तेथील शाळकरी मुले व नागरिकांनी प्रसंगावधान राखत तिची कुत्र्यांच्या तावडीतून सुटका केली. धनश्री भोलाराम शेलार असे जखमी मुलीचे नाव असून, तिच्यावर भिगवण येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.



या भागात आत्तापर्यंत जवळपास ४२ जणांना भटक्या कुत्र्यांनी जखमी केले आहे. येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिकेत लोखंडे यांनी त्यास दुजोरा दिला आहे. यावरूनच भटक्या कुत्र्यांच्या उपद्रव दिसून येतो. भोलाराम शेलार यांनी दिलेल्या माहितीनुसार धनश्री ही सकाळी किराणा वस्तू आणण्यासाठी नऊ वाजण्याच्या सुमारास दुकानात गेली होती.

त्या वेळी तिथे कळपाने उभ्या असलेल्या कुत्र्यांनी तिच्यावर हल्ला केला. भीतीने ती धावत होती तरीही एका कुत्र्याने तिच्या पायाला चावा घेतला. त्या वेळी तेथे उपस्थित असलेल्यांनी प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला. या आधी देखील याच कुत्र्यांनी चार ते पाच जणांना चावा घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, या घटनेमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. भिगवण गावात अनेक चौकात व गल्लीबोळात भटकी कुत्री पहावयास मिळतात. त्यातूनच हल्ला करण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत.

गेल्या तीन चार महिन्यांपूर्वी भिगवण ग्रामपंचायतीने कुत्र्यांच्या बंदोबस्त करण्यासाठी व त्यांना पकडण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली होती. त्यानंतर पुढे काहीच झाले नाही. मोकाट कुत्र्यांच्या त्वरित बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरत आहे.

## भारत इतिहास संशोधक मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. बी. डी. कुलकर्णी यांचे निधन

पुणे: भारत इतिहास संशोधक मंडळाचे उपाध्यक्ष, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिष्ठाता आणि महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अध्यक्ष, डॉ.भगवंत देवीदास कुलकर्णी (वय ७६ ) शुक्रवारी रात्री वृध्दापकाळाने निधन झाले.वैकुंठ स्मशानभूमीत शनिवारी दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे.

ते मुळचे उत्तर महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील शहादा चे रहिवासी होते. त्यांनी अहिल्यानगर येथील 'ब्रिटिश राज्याचा स्थापना व कारभार' या विषयावर पीएचडी केली. शिरूर येथे बोरा महाविद्यालयात तीस वर्षे प्राध्यापक, दोन वर्षे प्राचार्य, नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा महाविद्यालयातही प्राचार्य म्हणून काम पाहिले. निवृत्त झाल्यानंतर ते



पुण्यातील टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अधिष्ठाता म्हणून कार्य करीत होते. अनेक वर्षे ते अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून महाराष्ट्र इतिहास परिषदेमध्ये कार्यरत होते. गत दहा वर्षे ते भारत इतिहास संशोधक मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहत होते. त्यांनी वृत्तपत्र, संशोधन पत्रिकांमध्ये इतिहासावर विपुल लेखन केले आहे. त्यांचा अहिल्यानगर जिल्ह्याचे पहिले कलेक्टर हेनरी पोटींजर यांच्या कार्यपद्धतीवर लिहलेला अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

## वडगाव खुर्दमधील आरएमसी प्लांट तात्काळ हलवा; खासदार मेधा कुलकर्णींची मागणी

पुणे । प्रतिनिधी

वडगाव खुर्द परिसरातील रेडी मिक्स काँक्रीट प्लांटमुळे वाढते प्रदूषण आणि अपघातांच्या घटनांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. हे प्लांट तात्काळ हटवून स्थलांतरित करावेत, अशी मागणी खासदार मेधा कुलकर्णी यांनी केली आहे.



सिंहगड रस्त्यालगतच्या दत्तकृष्णाई मंगल कार्यालय ते प्रयेजा सिटी, मधुकोष सोसायटी, धायरी लेन या भागातील ठचउ प्लांटची पाहणी करताना त्यांनी अनेक अनियमितता निदर्शनास आणल्या. प्लांट चालकांकडून पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन, वाहतूक कोंडी, तसेच धोकादायक पद्धतीने वाहन चालवणे या गंभीर बाबी समोर आल्या.

या प्लांटमधून उडणारी सिमेंटची धूळ थेट नागरिकांच्या घरात जात असून, लहान मुले आणि वृद्धांमध्ये श्वसनाचे आजार वाढत असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे. तसेच रेडीमिक्स वाहतूक करणाऱ्या वाहनांमधून रस्त्यावर सिमेंट सांडल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. या भागातील रहिवाशांनी यापूर्वी प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे महापालिका आणि पोलिसांकडे अनेकदा तक्रारी केल्या, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.मेधा कुलकर्णी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कारवाईचे आदेश देत, अनधिकृत प्लांट बंद करून त्यांचे स्थलांतर करण्याची मागणी केली. तसेच नंबर प्लेट नसलेल्या आणि नियम मोडणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, या भागातील विविध सोसायट्यांमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनीही प्लांटमुळे होणाऱ्या त्रासाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, लवकरात लवकर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## शिरूर तालुक्यात ११०० कोटींच्या सिंचन योजनेला गती

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील पाबळ–केंदूर परिसरातील बारा गावांसाठी ११०० कोटीच्या सिंचन योजनेला गती मिळाली आहे. याबाबत सिंचन भवन पुणे येथे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची शुक्रवारी (दि. १०) आढावा बैठक पार पडली.

या योजनेसाठी माजी जिल्हा परिषद सदस्य जयश्री पलांडे व शेखर पांचुदकर यांनी पाठपुरावा केला. ही बैठक आमदार राहुल कुल यांच्या विशेष प्रयत्नातून आयोजित केली होती. जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री विखे पाटील यांनी या भागातील योजना मार्गी लावणार असल्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार या बैठकीत विविध अडचणी दूर करून अधिकाऱ्यांना



विविध प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

या वेळी या प्रकल्पासाठी १.१४ टीएमसी पाणी उपलब्धतेबाबत प्रस्ताव सादर केला. यास ३० मेपर्यंत मंजुरी मिळणे अपेक्षित आहे. या योजनेअंतर्गत एकूण १२ गावे लाभार्थी ठरणार आहेत. सुमारे १००० मिमी व्यासाची पाइपलाइन उभारण्यात येणार असून, प्रकल्पाचा अंदाजित खर्च १०० कोटी रुपये आहे. बॅरेज डिझाइनचे काम तातडीने सुरू करण्याचे तसेच कन्सल्टंटच्या तातडीने नियुक्तीचे निर्देश दिले.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर परिसरातील पाणीटंचाई कमी होऊन शेती व पिण्याच्या पाण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. या बैठकीस अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, मुख्य अभियंता ए. के. धुमाळ, जिल्हा परिषद सदस्या स्वाती पाचुंदकर, माजी जिल्हा परिषद सदस्या जयश्री पलांडे, शेखर पाचुंदकर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अशोकराव पलांडे, सतीश पाचंगे, समरजित गायकवाड आदी उपस्थित होते. मेअखेरपर्यंत लिफ्ट इरिगेशन सिस्टिम (एलआयएस) साठी जनरल लेआउट व बॅरेज लेआउट तयार करणे अपेक्षित आहे. प्रकल्पाचे अंदाजपत्रक व ३० जूनपर्यंत प्रशासकीय प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश दिले. ३० मेपर्यंत पाणीपुरवठा डिझाइन पूर्ण करण्याचे आदेश दिले. प्रकल्पामध्ये १०० टक्के सौर ऊर्जेचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. चासकमान कालवा, शिक्रापूर शाखा क्र. २ येथे मंजूर १५ पदे तातडीने भरवेत तसेच जातेगाव बुद्रुक येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे नादुरुस्त दरवाजे बदलण्याचे निर्देश संबंधित विभागास देण्यात आले.

## हातभट्टी दारू विक्रेत्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई, एक वर्षासाठी स्थानबद्ध

पुणे । प्रतिनिधी

शहरातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या धोरणाअंतर्गत पुणे पोलिसांनी हातभट्टी दारू विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर मोठी कारवाई केली आहे. लष्कर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शफिक अजीम शेख ( ४८, रा. २३८९, न्यू मोदीखाना, कॅम्प, पुणे) याला महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा (एमपीडीए) अंतर्गत एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्तांनी शहरातील सर्व प्रकारचे अवैध धंदे पूर्णपणे बंद करून त्यांचे समूळ उच्चाटन करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार लष्कर पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील शफिक शेख याच्यावर यापूर्वी महाराष्ट्र



प्रोहिबिशन क्ट कलम ९३ अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती.

त्याच्याकडून भविष्यात अवैध व्यवसाय न करण्याचा बॉन्डही लिहून घेण्यात आला होता. मात्र, त्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा न झाल्याने आणि अटींचे उल्लंघन केल्याने पोलिसांनी याची गंभीर दखल घेत पुढील कठोर कारवाई केली. (झींपश उीळाश पशी)

दि. १० एप्रिल रोजी पोलीस आयुक्तांनी एमपीडीए कायद्यान्वये आदेश काढत शफिक शेख याला एक वर्षासाठी कारागृहात स्थानबद्ध करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार त्याला छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले आहे.

या कारवाईमुळे न्यू मोदीखाना, सोलापूर बाजार आणि कॅम्प परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून परिसरात शांतता प्रस्थापित होण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त केले आहे. पोलिसांनी यापुढेही अशा प्रकारच्या अवैध धंद्यांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

ही कारवाई पोलीस उपआयुक्त परिमंडळ ०५ राजलक्ष्मी शिवणकर, सहायक पोलीस आयुक्त लष्कर विभाग संगिता शिंदे अल्फान्सो यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रदीप पवार, सहायक पोलीस निरीक्षक विशाल दांडगे, पोलीस उपनिरीक्षक राहुल घाडगे व अवधूत देशमुख, सहाय्यक पोलीस फौजदार जगदीश पाटील तसेच पोलीस अंमलदार भागवत राऊत आणि तपास पथकातील इतर कर्मचाऱ्यांनी ही कारवाई यशस्वी केली.